रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १६८
www.ramprahar.com

शुक्रवार, ३ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय -राज्यपाल/२
भारतीय स्त्रियांच्या उद्धारक सावित्रीबाई फुले/६
नेमबाज स्वप्नील कुसाळेला अर्जुन पुरस्कार जाहीर/८

## १० वर्षांत देशातील रोजगारात ३६ टक्क्यांनी वाढ



**नवी दिल्ली :** देशातील रोजगारात गेल्या १० वर्षात ३६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१४-१५मध्ये ४७.१५ कोटी लोकांना रोजगार मिळाला होता. यामध्ये वाढ होऊन २०२३-२४मध्ये ६४.३३ कोटी जणांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती केंद्रीय कामगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. आकडेवारी जाहीर करताना मांडविया यांनी सांगितले की, यूपीए (संयुक्त पुरोगामी आघाडी) सरकारच्या काळात २००४ ते २०१४ दरम्यान रोजगारात सुमारे सात टक्क्यांनी वाढ झाली होती. या कालावधीत केवळ २.९ कोटी नोकऱ्या निर्माण झाल्या, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळात २०१४ ते २०२४ दरम्यान १७.१९ कोटी नोकऱ्यांची वाढ झाली आहे. गेल्या एका वर्षात (२०२३-२४) देशात सुमारे ४.६ कोटी नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत.

# पनवेलमध्ये राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी

## प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार तसेच सुप्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २) येथे पत्रकार परिषदेत दिली.









श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी ११व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक टीआयपीएल, तर सहप्रायोजक निल ग्रुप आहेत. स्पर्धेसंदर्भात विस्तृत माहिती देण्यासाठी खांदा कॉलनी येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

या पत्रकार परिषदेस श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, कोषाध्यक्ष अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, समन्वयक गणेश जगताप, सदस्य चिन्मय समेळ, भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर उपस्थित होते.

या वेळी प्रसारमाध्यमांना माहिती देताना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, मराठी रंगभूमीला गेली अनेक वर्ष अनेक चांगले कलाकार, अभिनेते, दिग्दर्शक लाभले. **(पान २ वर..)**

# छोट्या शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम २२०मध्ये सुधारणा करण्यास गुरुवारी (दि. २) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे चार हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार आहेत. यामुळे छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबतच्या सुधारणा विधेयक मांडण्यास मंजूरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



तगाई किंवा तत्सम थकबाकी न भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम २२०नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारीपड म्हणून शासन जमा करण्यात येतात. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षाच्या आत भरणा केल्यास मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि, १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद नव्हती.

आता अशा जमिनी प्रचलित बाजारमूल्याच्या २५ टक्के रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६च्या कलम २२०मध्ये करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तसे विधेयक विधान मंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.

- **आकारी पड जमिनी मूळ खातेदारांना परत केल्या जाणार**
- **सुधारणा विधेयकास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता**

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीसाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाते उघडण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

सन २०२४-२५ वर्षासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बँक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली तसेच निवृत्तीवेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरिता आणि शासनाच्या सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीसाठी बँकेस प्राधिकृत करण्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## संघटन पर्व





**पेण : भाजपचे सदस्यता अभियान संघटन पर्व सध्या महाराष्ट्रासह देशभरात सुरू आहे. या अनुषंगाने दक्षिण रायगड जिल्ह्याची कार्यशाळा प्रभारी तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत गुरुवारी झाली. या वेळी व्यासपीठावर खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, जिल्हा संघटक सतीश धारप, सरचिटणीस मिलिंद पाटील, महेश मोहिते, गीता पालरेचा, प्रशांत शिंदे, बिपीन म्हामुणकर, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आदी उपस्थित होते.**

## निवडक

### मनू भाकेर, डी गुकेशसह चार खेळाडूंना 'खेलरत्न'

**नवी दिल्ली :** केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली आहे. यामध्ये २०२४च्या ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी नेमबाज मनू भाकेर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग आणि पॅरा अथलीट प्रवीण कुमार या चार क्रीडापटूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. १७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवन येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

### काश्मीर पुन्हा एकदा विकासाच्या वाटेवर -ना. अमित शाह

**नवी दिल्ली :** काश्मीरमध्ये दहशतवादाच्या घटना ७० टक्क्यांहून अधिक कमी झाल्या आहेत. दगडफेकीच्या घटना पूर्णपणे संपुष्टात आल्या. काश्मीर पुन्हा एकदा विकासाच्या वाटेवर निघाला आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. 'जम्मू-काश्मीर एवं लडाख : सातत्य आणि सम्बद्धता का ऐतिहासिक वृत्तांत' या पुस्तक प्रकाशनावेळी ते बोलत होते. काश्मीरचे नाव ऋषी कश्यप यांच्या नावावरून पडले असावे, असेही ते म्हणाले.

# पंतप्रधान मोदींकडून मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रशंसा अन् गडचिरोलीतील नागरिकांचे अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. नववर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेला गडचिरोली दौरा हा येथील नागरिकांच्या आयुष्यात सुख-समाधान आणण्यासह सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स'च्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यात विविध विकासकामांची सुरुवात करतानाच सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला. गडचिरोली यापुढे महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नसून तो पहिला जिल्हा ठरण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच या ठिकाणी सुरू असलेल्या औद्योगिकीकरणामुळे इथल्या नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, अशी ग्वाही या वेळी दिली.



गडचिरोलीच्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला. या बसमधून त्यांनी प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून सहा हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गडचिरोली जिल्ह्याची ही विकासयात्रा यापुढेही सुरू राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीतील नागरिकांना दिला आहे.

### गडचिरोली नक्षलमुक्त करण्यासह मुख्य प्रवाहात आणणार -मुख्यमंत्री



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाठिंबा व मार्गदर्शन यामुळेच गडचिरोलीसारख्या दुर्गम, आदिवासी भागांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आपल्या 'एक्स' समाजमाध्यमावर नमूद केले आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करून आदिवासी बांधवांचे जल, जमीन व जंगल हे हक्क अबाधित ठेवत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.



# एकवीरा गडावर मधमाशांच्या दंशाने अनेक भाविक जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

लोणावळ्याजवळील कार्ला येथील आई एकविरा गडावर मधमाशांनी अचानक भाविकांवर हल्ला करत चावा घेतला. नूतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी बुधवारी (दि. १) दुपारी ही घटना घडली.

एकवीरा गडावर देवीची एक पालखी आली होती. या वेळी पालखीसोबत अनेक भक्त आणि तरुण आले होते. यातील काही तरुणांनी गडावर रंगीत फटाके फोडले, ज्यामुळे माशा चिडल्या आणि त्यांनी भाविकांवर हल्ला चढवला. माशा बराच वेळ गडावर घोंगावत होत्या आणि सापडेल त्याला दंश करीत होत्या. त्यामुळे भाविक सैरावैरा धावत आश्रय शोधत होते. यात काही वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक, अल्पवयीन मुले, मुली, लहान बालके यांना जास्त त्रास झाला.



**उलवे नोड : निहॉनसिकी कराटे ॲण्ड स्पोर्ट्स फेडरेशनच्या वतीने पालघर येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चॅम्पियनशिपमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि तिवरेकर सेल्फ डिफेन्स ॲण्ड स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी ५२ पदके जिंकून उत्कृष्ट कराटे संघ म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कराटेपटूंचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, भार्गव ठाकूर, किशोर पाटील आदी उपस्थित होते.**

## गवळी दाम्पत्याच्या पोलीस कोठडीत वाढ

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण येथील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकेत असलेला आरोपी विशाल गवळी आणि त्याच्या पत्नीच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

आठ दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने गुरुवारी (दि. २) दोन्ही आरोपींना कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले होते. आरोपीच्या वकिलांनी कोर्टाकडे काही महत्त्वाचे पुरावे गोळा करण्यासाठी आरोपींच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी केली. यानंतर जिल्हा सत्र न्यायाधीश व्ही.ए. पत्रावळे यांनी दोन्ही आरोपींची पोलीस कोठडी ४ जानेवारीपर्यंत वाढवली आहे.

**कामोठ्यातील दुहेरी हत्याकांड**

# समलैंगिक संबंधाचा आग्रह ठरला काळ; दोघांना अटक



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीमध्ये एका राहत्या घरात वृद्ध आईसह तिच्या मुलाचा मृतदेह सापडल्याने परिसरात खळबळ उडाली होती. स्थानिक पोलिसांनी या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत तपास करून आरोपींना अटक केली आहे. समलैंगिक संबंध ठेवण्याच्या आग्रहावरून हा प्रकार घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

कामोठे से. ६ येथील ड्रीम्स सोसायटीतील फ्लॅट नं. १०४मध्ये गॅस लीक होऊन गॅसचा वास येत आहे अशी माहिती मिळाल्यावर कामोठे पोलीस ठाण्याचे बीट मार्शल तेथे पोहचले असता फ्लॅटचा दरवाजा आतून बंद असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी फायर ब्रिगेड स्टाफच्या सहाय्याने दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता जितेंद्र भूषण जग्गी (वय ४५) व त्याची आई गीता भूषण जग्गी (वय ७०) हे मृतावस्थेत आढळून आले होते. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

तपासादरम्यान तांत्रिक तपास व साक्षीदारांकडे विचारपूस करून संज्योत मंगेश दोडके (वय १९) आणि शुभम महिंद्र नारायणी (वय १९) यांना उलवे परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांची चौकशी केली असता मयत जितेंद्र जग्गी हा त्यांच्या चांगला परिचयाचा असून मयताने त्यांना ३१ डिसेंबर रोजी रात्री त्याच्या फ्लॅटमध्ये पार्टी करण्यासाठी बोलावले होते. तिथे तिघेही दारू प्याले. त्यानंतर जितेंद्र हा त्यांना समलैंगिक संबंध ठेवण्याकरिता आग्रह करत असल्याने शुभमने एक्सटेंशन बोर्ड जितेंद्रच्या डोक्यात मारून त्याला जीवे मारले, तर संज्योतने मयतच्या आईचा गळा आवळून तिचीही हत्या केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय -राज्यपाल राधाकृष्णन


## महाराष्ट्र पोलीस दल वर्धापन दिन साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन गोरेगाव येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय असून हे देशातील आदर्श पोलीस दल असल्याचे प्रतिपादन राज्यपाल राधाकृष्णन यांनी केले.

या कार्यक्रमाला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, पोलीस जवान व निमंत्रित उपस्थित होते.

यावेळी राज्यपाल म्हणाले की, मागील काही वर्षांमध्ये पोलीस दलातील आव्हाने वाढली आहेत. सागरी सुरक्षा, नक्षलवाद यांसारखे धोके आहेतच. त्याशिवाय सायबर सुरक्षा, युवकांमध्ये वाढती नशाखोरी आदी नव्या आव्हानांमुळे पोलिसांना अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. राज्य शासन पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत आहे. तसेच




मोठ्या प्रमाणावर पोलीस भरती देखील होत आहे. यामध्ये महिलांची वाढती संख्या ही उल्लेखनीय बाब आहे. महाराष्ट्र पोलीस हे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्यांच्या अद्वितीय समर्पण, शौर्य आणि उत्कृष्टतेसाठी ओळखले जातात. या दलाने दहशतवादी हल्ले, संघटित गुन्हे, टोळी युद्धे आणि बॉम्बस्फोट अशा असंख्य आव्हानांना सामोरे जात त्यांचा यशस्वी सामना केला असल्याचे राज्यपालांनी यावेळी नमूद केले.

मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यात दहशतवाद्यांना पकडून देण्यासाठी गोळ्या झेललेल्या तुकाराम ओंबळे यांच्या शौर्याचे राज्यपालांनी विशेष कौतुक केले. अशा शौर्यांच्या माध्यमातून भारत कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नसल्याचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. एक गुन्हेगार पुढे टोळीचे रूप धारण करू शकतो, त्यामुळे अनधिकृत शस्त्रे, अमली पदार्थ यांना पायबंद घालून महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी नष्ट करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २ जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता. त्यामुळे २ जानेवारी हा दिवस पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो, अशी माहिती पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी प्रास्ताविकाद्वारे दिली. भयमुक्त वातावरण ठेवून सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपालांनी सुरुवातीला शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये राज्य राखीव पोलीस बल पथक, मुंबई पोलीस सशस्त्र दल पथक, मुंबई पोलीस महिला पथक, ठाणे शहर– लोहमार्ग पोलीस पथक, मुंबई पोलीस दंगल नियत्रंण पथक तसेच निशान टोळी सहभागी झाले होते. यावेळी विशेष संचलन आणि हर्ष परेड सादर करण्यात आली. तसेच पाईप बँड आणि सायलेंट आर्म ड्रिल ची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यावेळी महासंचालकांनी राज्यपालांना स्मृतिचिन्ह प्रदान केले.

# कर्जतच्या अंत्रट गावातील विवाहित महिलेची आत्महत्या

## विषारी औषध घेऊन पाण्यात मारली होती उडी

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अंत्रट गावातील विवाहित महिलेने आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे.महिलेने सुरुवातीला विषारी औषध घेउन नंतर नदीच्या पाण्यात उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता मात्र महिलेला येथील स्थानिकांनी जिवंत सुखरूप बाहेर काढले तर अधिक उपचारासाठी महिलेला पनवेल रुग्णालयात नेले असता तिचा उपचार दरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली.



अंत्रट गावात राहणारी मयुरी किशोर लहाने ही आपल्या माहेरी म्हणजेच वडिलांच्या घरी दोन दिवस` देवपाडा येथे आली होती, दरम्यान बुधवार सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीत धनेश्वरी स्मशानभूमीत एकटीच बसल्याचे काही नागरिकांनी पाहिले होते. दुपारी या महिलेने विषारी औषध घेत बाजूला असणाऱ्या उल्हास नदीत आत्महत्या करण्यासाठी उडी घेतली.

सदर महिला येथील मच्छिमार करणाऱ्या तरुणांना पाण्यात दिसून आली. ही घटना तरुणांनी तात्काळ पोलीस पाटील यांना सांगीतली. या महिलेला येथील तरुणांनी सुखरूप बाहेर काढून तिला कर्जत येथून पनवेल एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.


महिलेवर रुग्णालयात उपचार सुरू असताना आज गुरुवार २ जानेवारी रोजी मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास नेरळ पोलीस करीत आहेत.

# माथेरान घाटात मालवाहू टेम्पोला अपघात

**माथेरान : बातमीदार**

माथेरान घाटात मालवाहू पीकअप टेम्पोला अपघात झाला आहे.उतारावर वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो उलटला.यामध्ये डी. जेचे सामान असल्याचे सांगण्यात आले. या अपघातात चालक आणि अन्य दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत

नेरळ माथेरान घाटात नवीन वर्षाला वाहनांचे अपघाताचे सत्र सुरू झाल्याचे चित्र आहे.



वर्षाच्या सुरुवातीलाच फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या इनोव्हा कारला अपघात झाला होता.त्यातच २ जानेवारीला जुम्मापट्टी येथील एस टन वळणावर पीकअप टेम्पोला उतरत असताना अपघात झाला.या मध्ये चालक आणि अन्य दोन साथीदार किरकोळ जखमी झाले आहेत.

माथेरान घाटात चालक वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करतात त्यामुळेच वाहनाचे ब्रेक न लागणे,चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटण्याचे प्रकार घडत आहेत असे बोलले जात आहे.

# श्रीवर्धन भूमी अभिलेख कार्यालयात पदे रिक्त

## नागरिकांना अडचणींचा सामना; पदभरतीची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात रिक्त जागांच्या संख्येत वाढ झाली असून, नागरिकांना त्यांच्या महत्त्वाच्या कामासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सोळा पदांपैकी दहा पदे रिक्त असून, यामुळे कार्यालयाच्या कामकाजावर मोठा परिणाम होत आहे.

सध्या कार्यालयात एकच निमतानदार आणि एक भूकरमापक कार्यरत आहेत. यासोबतच अनेक कर्मचारी निवृत्त, बदली किंवा रजेवर असल्याने, नागरिकांची कामे उशिरा किंवा अपूर्ण होत आहेत. विशेषत: शेतकरी व नागरिकांना जमिनीच्या मोजणीसंबंधी, प्रॉपर्टी कार्ड, बँक कागदपत्रे, वारसाने नोंद, खरेदी नोंद तसेच विविध दाखले मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांवर अवलंबून रहावे लागते

**अशी आहेत रिक्त पदे**

निमतानदार – दोन जागांपैकी एक रिक्त भूकरमापक – दोन जागांपैकी एक रिक्त कनिष्ठ लिपीक – रिक् अभिलेखपाल – प्रतिनियुक्तीवर, प्रतिलिपी लिपीक – अनधिकृत रजेवर , नगर भूमापन लिपीक – गैरहजर (राजीनामा सादर) , आवक–जावक लिपीक – रिक्त , दुरुस्ती लिपीक – रिक्त, वर्ग चार दप्तर बंद – रिक्त, शिपाई – चार जागा रिक्त

श्रीवर्धन तालुक्यातील ७८ खेड्यांतील ग्रामस्थांना या अडचणींमुळे मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. डोंगराळ आणि दुर्गम भागात असलेल्या गावे व वाड्या असलेल्या या तालुक्यात एसटी आणि मिनीडोरच्या तुरळक फे–यांमुळे, नागरिकांची ये–जा ही अवघड बनली आहे. परिणामी, भूमी अभिलेख कार्यालय गाठणारे वृद्ध नागरिक व ग्रामस्थ निराश होऊन परत जात आहेत.

प्रशासनाने लवकरच रिक्त पदांची भरती करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून I कामांमध्ये दिरंगाई होणार नाही आणि आवश्यक कागदपत्रे वेळेवर मिळू शकतील.

## पनवेलमधील सर्व मंदिरात श्री रामनाम सामूहिक जप

**पनवेल :** आयोध्या येथे भव्य श्रीराम मंदिराचा २२ जानेवारी २०२४ रोजी प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला होता. सदर सोहळा निर्विघ्न पार पडावा याकरिता पनवेल मधील सर्व श्रीराम प्रेमी भक्तांनी एकत्र येऊन दिनांक १५ जानेवारी २०२४ ते २२ जानेवारी २०२४ या सप्ताहात आपल्या घरा जवळच्या मंदिरात रोज संध्याकाळी सात ते साडेसात सामूहिक श्रीराम नाम जपाचा संकल्प पूर्ण केला होता आणि सर्वांनी श्री राम नामाचा आनंद घेत या संकल्पात सहभागी झाले होते. त्याच प्रमाणे भव्य श्रीराम मंदिराचा प्रथम वर्धापन दिन तिथी नुसार पौष शु.द्वादशी म्हणजेच ११ जानेवारी रोजी साजरा होणार आहे.त्याचे निमित्त साधून पनवेल मधील सर्व मंदिरात दिनांक ५ जानेवारी ते ११ जानेवारी रोज संध्याकाळी ७ ते ७.३० एकाच वेळी श्री रामनाम जप करण्यात येणार आहे तरी सर्व श्रीराम भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ही विनंती–जय श्रीराम

## खोपोली बायपासजवळ बसची चार वाहनांना धडक

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटातील खोपोली बायपास जवळ सकाळी पाउणे अकराचे सुमारास खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसने पुढे जाणाऱ्या गाडीला धडक दिली. त्या गाडीने इरटिका कार, वॅगन आर, टाटा सफारी अशा चार वाहनांना धडक दिल्याने वाहनांचे नुकसान झाले, मात्र जीवित हानी मात्र टळली.

ओडिसी गाडी द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपास जवळ आली असता चालकाने गाडीचा वेग कमी केला. त्याच वेळी पाठीमागून खाजगी बस वेगात येत ईरटीका कारला धडकली.त्याच्या पुढे असणाऱ्या गाड्यांना



ईरटीका गाडीने पाठीमागून मारुती वॅगनार त्यानंतर टाटा सफारीला धडक दिली. वाहतूक पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला केली व वाहतूक सुरळीत झाली.

# असंख्य माणगावकरांच्या उपस्थितीत शेकडो साईभक्त निघाले शिर्डीला

## ■ पदयात्रा पालखी झाली रवाना

**माणगाव : बातमीदार**

माणगांव ओम सिद्धी साई दिंडी कोकण ही २ जानेवारी रोजी माणगाव शहरातील नानोरे ते शिर्डीकडे जाणाऱ्या पदयात्रेचा प्रारंभ सकाळी १० वाजता झाला. १३ वर्षाची परंपरा असलेली ही दिंडी सकाळी नानोरे साई मंदिर येथून सुरुवात झाली. नानोरेचे ग्रामदैवत जनी बापूजी मंदिराला व गावाला प्रदक्षिणा देत ही पालखी पदयात्रा श्री दत्त मंदिर माणगाव,श्री साई मंदिर विकास कॉलनी ते दशरथ गावडे यांचे निवासस्थान व त्यांनतर निजामपूर येथे रात्री वस्ती अशी श्री क्षेत्र शिर्डी कडे रवाना होणार आहे.

सुमारे ३०० किमी पायी प्रवास असणाऱ्या पदयात्रेत सुमारे



३०० साईभक्त सामील आहेत त्यापैकी १७५ साईभक्त पायी प्रवास करणार आहेत.या परंपरागत दिंडीचे नियोजन संस्थापक अशोक वाढवळ यांच्या प्रेरणेने साई चरणरज समाधान उतेकर,कान्हा महाराज, कार्यकारिणी अध्यक्ष सुभाष उतेकर, उपाध्यक्ष गजानन वाढवळ, चिटणीस महेंद्र पाटोळे,सहचिटणीस भारत जाधव,पालखी सोहळा अध्यक्ष संतोष खडतर, उपाध्यक्ष महेश शिर्के,मराठी उद्योजक सुभाष(दाजी) दळवी, खजिनदार मनोज पोवार,उपखजिनदार परेश म्हात्रे, सल्लागार दीपक थळकर,मिलिंद साखरे,सागर कोळवनकर,रमेश बक्कम यांच्यासह तालुक्यातील बहुसंख्य साईभक्तांनी केले आहे.

या पदयात्रेचा प्रवास सुमारे ८ दिवसांचा असून प्रतिदिन ४० किमी अंतर साईभक्त कापणार आहेत. ही साईपालखी निजामपूर नंतर ३ जानेवारी रोजी डोंगरवाडी विंझाई देवी मंदिर ताम्हिणी. ४ जानेवारी मुळशी पौड,५ जानेवारी पौड ते देहू, ६ जानेवारी राजगुरू नगर अवसर फाटा मंचर,७ जानेवारी आळेफाटा धारगाव,८ जानेवारी साकुरफाटा ते संगमनेर ,९ जानेवारी कवठे कमळेश्वर ते नांदूरखी,१० नांदूरखी ते शिर्डी असा असणार आहे.या पालखी च्या मिरवणुकीचे खास आकर्षण नाचणारा घोडा असते

पान १ वरुन

## पनवेलमध्ये राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी

त्यांनी त्या काळात त्यांच्या मेहनतीने मराठी रंगभूमी यशस्वीरित्या उभी केली, वारसा पुढे वाढवला. अशाच काही कलाकारांचा गुणगौरव हा अटल करंडकच्या रंगमंचावर करण्यात येतो. या स्पर्धेच्या आठव्या वर्षापासून गौरव रंगभूमीचा या पुरस्काराने मान्यवर व्यक्तीसह सन्मानित केले जाते. आतापर्यंत यामध्ये प्रसिद्ध दिग्दर्शक प्रकाश बुद्धीसागर, ज्येष्ठ अभिनेते कै. जयंत सावरकर, प्रसिद्ध अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांना सन्मानित करण्यात आले आहे. यंदा प्रसिद्ध अभिनेते दिग्दर्शक सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

गेली दहा वर्षे चाललेल्या अटल करंडक स्पर्धेने टप्प्याटप्याने उच्चांक गाठला आहे. कोरोना काळातही एवढ्या मोठ्या स्तरावर अटल करंडक ही एकमेव स्पर्धा होती, जी संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वीरीत्या संपन्न झाली. स्पर्धेच्या आठव्या वर्षी कोरोनाचे सर्व निर्बंध पाळत त्या काळातही प्राथमिक फेरीसाठी जवळपास १०६ संघांनी सहभाग घेतला होता. या वर्षीदेखील स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत १०८ संघांनी सहभाग घेतला. या प्राथमिक फेरीला १४ डिसेंबरपासून विभागनिहाय प्रारंभ झाला. जळगाव व नागपूर केंद्र, पुणे सातारा केंद्र, कोल्हापूर केंद्र, रायगड (पनवेल) केंद्र, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली या केंद्रांची प्राथमिक फेरी झाली. प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून आशीर्वाद मराठे आणि मानसी दोषी–मराठे यांनीही कामगिरी यशस्वीरित्या पार पाडत महाअंतिम फेरीसाठी सर्वोत्कृष्ट अशा २५ एकांकिकांची निवड केली आहे.

निवड झालेल्या एकांकिकांची महाअंतिम फेरी १०, ११ आणि १२ जानेवारी रोजी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या वेळी परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या मोने, प्रसिद्ध दिग्दर्शक देवेंद्र पेम व विराजस कुलकर्णी हे काम पाहणार आहेत.

एकांकिका स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच कोणत्यातरी एकांकिका स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसिडर अशी एक नाविन्यपूर्ण संकल्पना सुरू करण्यात आली. अटल करंडकमधून जो कलाकार विजेता आहे आणि आज तो यशस्वीरित्या या क्षेत्रात कार्यरत आहे अशा एका कलाकाराला आम्ही ब्रँड ॲम्बेसिडरचा मान देण्याचे ठरविले होते. त्यानुसार सुप्रसिद्ध अभिनेता ओंकार भोजने याची नियुक्ती ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून अटल करंडकच्या आठव्या वर्षासाठी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे नवव्या वर्षी सुप्रसिद्ध अभिनेता, महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम, निरागस विनोदीवीर पृथ्वीक प्रताप याची, तर मागील वर्षी म्हणजेच दहावव्या वर्षी सुप्रसिद्ध अभिनेता, सीकेटी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि अटल करंडक व मल्हार करंडकमधील स्पर्धक अजिंक्य ननावारे याची निवड करण्यात आली होती. या वर्षी सुप्रसिद्ध बिग बॉस फेम, माझ्या नवऱ्याची बायको फेम आणि अटल करंडकची २०१८ची स्पर्धक अभिनेत्री रुचिरा जाधव ब्रँड ॲम्बेसिडर आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रकमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण रुपये दोन लाख ७० हजारांची मुख्य पारितोषिके आणि ३८ हजार रुपयांची वैयक्तिक पारितोषिके देण्यात येतात तसेच प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशी मिळून चार लाखांची पारितोषिके देण्यात येतात. प्रथम पारितोषिक एक लाख रुपये प्रमाणपत्र व मानाचा अटल करंडक, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये प्रमाणपत्र व चषक, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये प्रमाणपत्र व चषक, चतुर्थ पारितोषिक २५ हजार रुपये प्रमाणपत्र व चषक तर उत्तेजनार्थ दोन पारितोषिक असून त्यांना १० हजार रुपये प्रमाणपत्र व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिकेला १५ हजार रुपये, वैयक्तिक गटात उत्कृष्ट अभिनेता, उत्कृष्ट अभिनेत्री, नेपथ्य, संगीत, लाईट, लेखक आणि दिग्दर्शक, विनोदी कलाकार, सर्वोत्कृष्ट बाल कलाकार यांनाही पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर पनवेलमधील दिवंगत लोकप्रिय नाट्य कलावंत व वेशभूषाकार कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट वेशभूषा विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे, अशीही माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी सांगितले की, मल्हार महोत्सवाच्या निमित्ताने एकांकिका स्पर्धा सुरू झाली. ती गेल्या १० वर्षात अटल करंडकच्या रूपाने राज्यस्तरीय स्पर्धा झाली. कोरोनाच्या काळात आयोजन करणारी आणि यशस्वी अशी ही एकमेव स्पर्धा ठरली. कलाकारांना व्यासपीठ आणि सन्मान देण्याचे काम या स्पर्धेतून होत आहे, याचे आम्हाला आयोजक म्हणून समाधान आहे. सीकेटी महाविद्यालयाचे कला क्षेत्रात असलेले काम आणि सहभागामुळे स्पर्धा परिपूर्ण झाली असून टीम अटल करंडक मेहनत घेऊन काम करत आहे. या स्पर्धेच्या नियोजनाचे नेहमीच कौतुक होत असून यशस्वीतेमुळे अटल करंडकला प्रतिष्ठा प्राप्त झाली. निल गुपचे विलास कोठारी व कल्पना कोठारी, पनवेल महापालिका, कलाकार आणि रसिकांचा नेहमीच पाठिंबा मिळत असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले. कलाकारांना व्यासपीठ मिळावे यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न राहिला असून त्या अनुषंगाने कार्यशाळा तसेच प्रशिक्षणवर्गही यापूर्वी घेतले असल्याचे त्यांनी सांगितले.

श्यामनाथ पुंडे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीद वाक्य घेऊन गेली १८ वर्ष पनवेलमध्ये एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आधी सात वर्ष ही स्पर्धा मल्हार करंडक या नावाने जिल्हास्तरीय स्वरूपात आयोजित केली जात होती. गेली १० वर्ष स्पर्धा अटल करंडक या नावाने राज्यस्तरीय स्वरूपात आयोजित केली जात आहे.

नाट्य चळवळ वृद्धींगत व्हावी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो.

### अशी होईल महाअंतिम फेरी

१० जानेवारी : सखा (एमईएस आयएमसीसी कॉलेज, पुणे), न्युरालिंक (तोंडक मोडक नाट्यसंथा, ठाणे), वर्तुळ (रंगवेध थिएटरर्स, पनवेल), कलम ३७५ (परिवर्तन, कोल्हापूर), कुक्कुर (सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे), क्रॅक्स इन द मिरर (कलांश थिएटरर्स, मुंबई), पिंडग्रान (डी.वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर), गुड बाय किस (जिराफ थिएटरर्स, मुंबई), जुगाड लक्ष्मी (गुरू नानाक खालसा कॉलेज, मुंबई).

११ जानेवारी : पसायदान (कल्लाकार्स, नौपाडा ठाणे), व्हाय नॉट (आर.आय.टी., इस्लामपूर), ब्रह्मपुरा (एम. डी. कॉलेज, परळ, मुंबई), Gene Gene झिंगाट (म.ल. डहाणूकर, मुंबई), सर्पसत्र (एम्पिरिकल फाउंडेशन, कल्याण), अलमोस्ट डेड (रंगप्रसंग, कोल्हापूर), गोधा आणि कमुचा फार्स (रंगशाळा, जळगाव), देव–बाप्पा? (कलाकार मंडळी, पुणे), हनिमून (एस. एम. प्रॉडक्शन, पुणे).

१२ जानेवारी : चिनाब से रावी तक (क्राऊन नाट्यसंस्था आणि स्टोरीया प्रॉडक्शन, डोंबिवली), जापसाल (उगवाई कलारंग, फोंडाघाट कणकवली), आविघ्नेया (सिडेनहॅम कॉलेज, मुंबई), बॉईल्ड–शुद्ध शाकाहारी (कलादर्शन व नाट्यशृंगार, पुणे), बॉडी ऑफ नरेवाडी (फितूर थिएटर सोसायटी, संत झेवियर कॉलेज, मुंबई), पाटी (एकदम कडक नाट्यसंस्था, मुंबई), वेदना सातारकर हजर सर (सी.के. ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, पनवेल).

## निवडक

### गाडीच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव इनोव्हा गाडीची धडक पादचार्याला बसल्याने त्यात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पनवेल-गोवा महामार्गावरील जेडब्ल्यूसी गेटसमोर भरधाव इनोव्हा गाडी घेवून जाणारा चालक कमल यादव याने पादचारी राजेंन दमेनबा मोनाशी (वय ५७) याला धडक दिल्याने तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### हॉटेलमधील रोख रकमेची चोरी

**पनवेल :** खारघर येथील २ हॉटेलमध्ये प्रवेश करून हॉटेलमध्ये ठेवलेली एक लाख ९४ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी चोराविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर सेक्टर १२ येथील प्रणाम हॉटेलचे शटर उचकटून आणि कडी तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला आणि हॉटेलमधील एक लाख ४९ हजार रुपये चोरून नेले. तर सेक्टर २१ येथील उडपी श्रीकृष्ण हॉटेलमधून ४४ हजार ८५० रुपयांची चोरी केली आहे.

### टी पॉईंटजवळ बॅटऱ्यांची चोरी

**पनवेल :** ट्रान्सपोर्टमध्ये वापरत असलेल्या बल्करमधून अज्ञात चोरट्यांनी दोन बॅटऱ्यांची चोरी केल्याची घटना पनवेलजवळील टी पॉईंटजवळ घडली आहे. यावरील चालक सरोज याने सदर बल्कर उभा करून ठेवला असता अज्ञात चोरट्यांनी या ठिकाणावरुन ३० हजार रुपये किंमतीच्या दोन निळ्या पांढऱ्या रंगाच्या बॅटऱ्यांची चोरी केली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### लाखोंचे कोकेन हस्तगत

**पनवेल :** खारघर वसाहतीमधील सेक्टर २७ येथील बी.डी.सोमानी शाळेसमोरील रस्त्यावर पोलिसांनी एका व्यक्तीला सव्वातीन लाख रुपये किमतीच्या कोकेन या अमलीपदार्थासह अटक केली. बासील रोनाल्डो ओबीओरो असे अटक आरोपीचे नाव आहे. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक दीपक सुर्वे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अमली पदार्थ विक्रीसाठी येणाऱ्या व्यक्तीला पकडण्यासाठी सेक्टर २७ येथील मेट्रो पुलासमोरील रस्त्यावर पोलिसांनी सापळा लावून एका संशयित दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन पिशव्यांमध्ये ३२.२८ ग्रॅम वजनाचे कोकेन हे अंमलीपदार्थ सापडले.

### विद्यार्थ्यांची पोलीस ठाण्याला भेट

**पनवेल :** पोलीस स्थापना दिनाच्या औचित्याने २ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान पोलीस रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत असून त्याअंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे याकूब बेग विद्यालय, पनवेल येथील विद्यार्थ्यांच्या पोलीस ठाणे भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी वर्गाने पोलीस ठाणे कामकाजाची माहिती दिली. तसेच शस्त्रास्त्रांसंबंधी माहिती दिली. नमूदवेळी १०० विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# रस्ता रुंदीकरणाला वेग

## पनवेल मनपाची टपाल नाका येथे अतिक्रमण कारवाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील टपाल नाका येथे रस्ता रूंदीकरणासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार, अतिक्रमण उपायुक्त रविकिरण घोडके व प्रभाग ड पनवेलच्या सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.२) सहा गाळ्यांवरती निष्कांसन कारवाई करण्यात आली. तसेच टपाल नाक्यावरील ८०-९० वर्षे जुनी धोकादायक , एक मजली लाकडी इमारतीवर जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक संचालक नगर रचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर,सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, तसेच प्रभाग अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.तसेच पनवेल शहर वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, वाहतुक वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

टपाल नाका येथे दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी वाढू लागल्याने याठिकाणी रस्ता रूंदीकरण करणे महत्वाचे होते. या कामात अडथळा येणाऱ्या सहा गोळयांवर पालिकेच्या वतीने जेसीबीच्या साहाय्याने मोठी निष्कांसन कारवाई करण्यात आली. तसेच येथील ८०-९० वर्षे जुनी धोकादायक एक मजली लाकडी इमारतीवर जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली.

# एसटी बसमधून डिझेलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गाडीतून ११० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे

बाळकृष्ण पिंटूळे, एसटी चालक हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस (एमएच २० बीएल २२०८) घेऊन निघाले. रात्री एकच्या सुमारास गाडी शिरूर येथून मुंबईच्या दिशेने घेऊन ते निघाले. पहाटे चारच्या सुमारास लोणावळ्यावरून कळंबोलीकडे जाणाऱ्या द्रुतगती महामार्गावर जेएनपीटी मार्गाकडे जाणार्या वळणावर गाडीच्या समोरील दोन्ही टायर जाम झाली त्यावेळी व्हील गरम झाल्याचे आढळले. गाडी त्याच ठिकाणी बाजूला लावली आणि इतर प्रवाशांना दुसर्या गाडीमध्ये बसून दिले. त्यानंतर सकाळी साडेसहा वाजेपर्यंत ते गाडीत झोपले. गाडीचे व्हील थंड झाल्याने ते पनवेल आगार येथे गाडी घेऊन पोहचले. मेकॅनिकने गाडी दुरुस्त केली, मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आठच्या दरम्यान चेंबूर नाका येथे गाडी बंद पडली.

या वेळी डिझेलच्या टाकीचे झाकण उघड्या अवस्थेत व टाकी रिकामी दिसून आली. या प्रकारातून अनोळखी चोराने ११० लिटर डिझेलची चोरी करण्याचा प्रकार घडला. त्यानुसार त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

### बांगलादेशींना अटक

**पनवेल :** तालुका पोलिसांनी ठोंबरेवाडी येथील सोलासीया प्रकल्पाशेजारून तीन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले असून कामगार म्हणून ते पनवेलमध्ये काम करत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने पनवेल तालुक्यातील ठोंबरेवाडी येथून या तिघांना ताब्यात घेतले. मोहम्मद इमादुल अनवर हुसेन, मसूद बबलू मंडल, शकील सैदुल शेख यांची पोलिसांनी चौकशी केल्यावर त्यांच्याकडे बांगलादेशातून भारतात येण्यासाठी लागणारे पारपत्र नव्हते.

# अटक आरोपी फरार

## सहाय्यक पोलीस निरीक्षक निलंबित

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिसांनी विदेशी नागरिकाला आसरा दिल्याप्रकरणी अटक केलेला संशयित आरोपी केशव कडू पोलिसांना चकवा देत पोलीस ठाण्यातून फरार झाला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक गणेश कौतीक जाधव यांना कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी तसेच कर्तव्यात बेजबाबदारपणा आणि निष्काळजीपणा केल्याप्रकरणी सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त संजय येनपुरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार नवी मुंबई हद्दीत बेकायदा राहणाऱ्या विदेशी नागरीकाविरोधात विशेष कोंबिग ऑपरेशन राबवून जवळपास १६ आफ्रिकन नारिकांना खारघर, तळोजा आणि उलवे परिसरातून ताब्यात घेतले होते. त्या प्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हेदेखील दाखल करण्यात आले आहेत, असाच एक गुन्हा खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल करण्यात आला होता. त्यानुसार विदेशी नागरिकांना बेकायदा आसरा देणाऱ्या मालकावरदेखील कारवाई सुरू करण्यात आली होती. या प्रकरणी खारघर पोलिसांना पाहिजे असलेला संशयित आरोपी घरमालक केशव कडू याला पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू केली होती.

अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे व पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ यांनी पुढील कारवाईसाठी संशयित केशव कडू याला खारघर पोलिसांच्या ताब्यात दिले होते. केशव कडू याला खारघर पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतर, संशयित आरोपी केशव कडू याच्यावर अटकेची कारवाई सुरू झाली. याचवेळी, संशयित आरोपी कडू याने पोलिसांना चकवा देत पोलिस ठाण्यातून धूम ठोकत फरार झाला. या घटनेमुळे पोलीस खात्यात खळबळ माजली होती.

या प्रकरणानंतर संशयित आरोपीविरोधात गुन्हा देखील दाखल करण्यात आला. ज्या पोलीस अधिकाऱ्याच्या ताब्यातून संशयित आरोपी फरारा झाला त्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव यांची खातेंतर्गत चौकशी सुरू झाली आणि अखेर या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव यांना दोषी ठरवत कर्तव्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याप्रकरणी वरिष्ठांच्या आदेशानुसार जाधव यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.



**पनवेल : सामाजिक कार्यकर्ते रवींद्र कोंडले यांची कन्या आकांक्षा हिने केशवजी वीरजी कन्या विद्यालयात झालेल्या भेटकार्ड स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.**





**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी २०२५ सालची दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. दरम्यान, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना ही दिनदर्शिका देऊन नवीन वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. प्रकाशनावेळी भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, समीर मोरे, पंकज आष्टीकर, संदीप सोनावले, पराग कार्ले उपस्थित होते.**

# विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढतेय -जितेंद्र मिसाळ



**उरण : वार्ताहर**

आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढत आहे. त्या अनुषंगाने त्यांना अपेक्षित असलेले शिक्षण देण्याचे काम पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून केले जात आहे. असा खारपाटील बंधूंच्या गौरवस्पद कार्याचा उल्लेख उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी आपल्या भाषणातून केला.

चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन सोहळा गुरुवारी (दि. २) जानेवारी रोजी झाला त्यावेळी ते उद्घाटनपर भाषणात बोलत होते. या वेळी व्यासपीठावर पी.पी. खारपाटील, एकनाथ पाटील, राजेंद्र खारपाटील, के. एन.शेट्टी, अमरसिंह राऊत, समीर खारपाटील, सागर खारपाटील, परीक्षित ठाकूर, वर्षा खार पाटील, सुनिता खारपाटील, अर्चना ठाकूर, व्ही. ए पाटील, एम.एन.पट्टेबहादूर, सुप्रिया पाटील, सुरेश पाटील, अलंकार परदेशी, रमाकांत पाटील आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक एम.एन. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले. तर पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. पवार यांनी सूत्रसंचालन केले. स्मिता मसुरकर यांनी आभार मानले.



**नवीन पनवेल : बद्री केदार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे श्री नर नारायण सेवा समिती सार्वजनिक पनवेल समाजच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत लोकप्रिय कथावाचक स्वामी मूलचंद महाराज यांचे दर्शन घेतले. या वेळी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, केशव यादव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप बिस्ट आहेत.**

# पनवेलमधील शासकीय अध्यापक महाविद्यालयात सामूहिक वाचन उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील शासकीय अध्यापक महाविद्यालय येथे बुधवारी (दि.१) वाचन संकल्प महाराष्ट्राचा या महत्त्वपूर्ण विषयावर सामूहिक वाचन उपक्रम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी कोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजयनारखेडे,मा. प्राचार्यडॉ. रमा भोसले, सर्व प्राध्यापक वृंद आणिप्रथम व द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापक उपस्थित होते.

सर्वप्रथम, कोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे वमा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी फलकावरील फीतकापूनसामूहिक वाचनउपक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर, प्राचार्य डॉ. रमा भोसले



यांनीकोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी प्राचार्य डॉ. भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कोकण विभाग सहसंचालकव (उच्च शिक्षण) डॉ. विजय नारखेडे यांनीवाचन संकल्प महाराष्ट्राचाया विषयावरमार्गदर्शन केले. प्राचार्य भोसले तसेच सर्व प्राध्यापक वृंदआणि प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनीग्रंथालयातून मिळालेल्या ग्रंथाचे वाचनकेले.

हा उपक्रम १ ते१५ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये राबवला जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजनप्रा. डॉ. प्रियांका सुभेदारयांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्मितल कुरूप यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.

# लोखंड बाजारात लवकरच पहिली वाहतूक चौकी

**पनवेल :** लोखंड पोलाद बाजारामध्ये पहिल्यांदा वाहतूक पोलीस ठाणे आणि चौकी सुरू करण्यासाठी भूखंड देण्याची प्रक्रिया सिडको मंडळाने सुरू केली आहे. नूकत्याच या भूखंडाची पोलीस व सिडको अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली. तब्बल ४० वर्षांनी पहिल्यांदा पोलिसांसाठी या परिसरात भूखंड मिळणार आहे.

राज्य सरकारने १९८० साली आशिया खंडातील सर्वांत मोठे लोखंड व पोलाद बाजार कळंबोली येथील ३०२ हेक्टर जमिनीवर सिडकोच्या माध्यमातून वसवला. बाजार परिसरामध्ये १९६० गोदाम खासगी व्यापाऱ्यांना सिडको मंडळाने भाडेतत्वांवर दिले आहेत. याच व्यापारी गोदामांच्या सुरक्षेसाठी आणि दळणवळणासाठी पोलीस चौकी असावी अशी मागणी व्यापाऱ्यांकडून अनेक वर्षांपासून केली जात होती, मात्र सिडको आणि पोलीस विभागामध्ये हे हस्तांतरण रखडले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तपदाची सूत्रे मिलिंद भारंबे यांनी हाती घेतल्यावर लोखंड पोलाद बाजारातील वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी त्यांनी बाजाराला भेट दिली. त्याच भेटीनंतर बाजारात सीसीटिव्ही कॅमेरे लावणे आणि पोलिसांसाठी स्वतंत्र चौकी बांधण्यासाठी भूखंडाच्या मागणीसाठी सिडको मंडळाकड पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे मागील आठवड्यात अडीच गुंठे क्षेत्राचे दोन भूखंड पोलिसांना देण्याच्या प्रक्रियेला वेग आला. जागा पाहणीनंतर हस्तांतरण प्रक्रियेला वेग आल्याची माहिती वाहतूक विभागाचे वपोनि हरिभाऊ बानकर यांनी दिली.

# महर्षी वि.रा. शिंदे यांची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये थोर समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

अभिवादन सभेत विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. इयत्ता नववी क च्या वर्गांच्या वतीने वर्ग शिक्षक प्रमोद करावकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी क या वर्गातील विद्यार्थिनी अनुष्का आव्हाड व रसिका रौंधळ यांनी केले. तर प्रतिक प्रशांत नाडे, श्रीधर सुतार, तनुश्री गुळवे व सिमरन डकावे आदी विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

या वेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, कलाशिक्षक गणेश भोईर, सुजाता शेलार, वर्ग शिक्षक प्रमोद करावकर, संगणक शिक्षिका सोनाली घरत व जोत्स्ना कोळी तसेच शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## संपादकीय

# गडचिरोलीत विकासाची पहाट

दुर्गम, नक्षलग्रस्त गडचिरोलीसाठी नववर्षाचा पहिला दिवस खास ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीचा दौरा करून विकासकामांची सुरुवात करतानाच सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला. त्यामुळे तेथे विकासाची नवी पहाट उगवली आहे.

**महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला भरभरून यश दिले. नागरिकांनी टाकलेला हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी अभ्यासू, कार्यतत्पर आणि जनतेशी बांधिलकी जपणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामाला लागले आहेत. त्यांनी आगामी १०० दिवसांचा कार्यक्रम आखून अधिकाऱ्यांना त्या दृष्टीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप झाल्यानंतर आता लवकरच पालकमंत्रिपदांची जबाबदारी वितरित करण्यात येईल. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री भूषविण्याची इच्छा व्यक्त केली. अर्थात, महायुतीचे प्रमुख नेते ज्या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देतील ते स्वीकारेन हेही ते म्हणाले होते. सर्वसाधारपणे सुस्थितीतील आणि महत्त्वाच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद मिळावे अशी मंत्र्यांना आशा असते, परंतु मुख्यमंत्री फडणवीसांनी दुर्गम, नक्षलग्रस्त गडचिरोलीला प्राधान्य दिले यावरून ते किती धाडसीपणाने आणि मनापासून राज्याचे नेतृत्व करताहेत हे स्पष्ट होते. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी गडचिरोलीचा दौरा केला. सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम व नक्षलप्रभावीत मानला जातो. तेथे जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत. त्यानंतर दुपारी कोनसरी येथे लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. शिवाय लॉईडस काली अम्मल हॉस्पिटल आणि लॉईडस राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ केला. ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. यातून खाणींचे संरक्षण होणार आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. ग्रीन माईनिंगचा प्रयोग देशातून गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यांच्यावर महाराष्ट्रात एक कोटींपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारने सुद्धा त्यांच्यावर बक्षिस जाहीर केले होते. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली. गेल्या सहा महिन्यात १६ जहाल नक्षलवादी आणि हे ११ असे २७ जण मुख्य प्रवाहात आले आहेत. पोलीस दलाच्या प्रयत्नामुळे सातत्याने नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे. गडचिरोलीच्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल पंतप्रधानांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वासही त्यांनी आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे. एकंदर मुख्यमंत्री फडणवीस लोकाभिमुख कामकाज करीत असून त्यांना पक्षश्रेष्ठींकडूनही पाठबळ मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे गडचिरोलीसह राज्याचा विकास आता थांबणार नाही हे नक्की!**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) बदललेल्या परिस्थितीत शेतकऱ्यांची आवश्यकता विचारात घेता ही योजना सुधारित करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या नावाने दि.५ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत आर्थिक निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटक समाविष्ट करण्याबाबत दि.१ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार शासनाने मान्यता दिली आहे.या योजनेमध्ये सन २०२४-२५ या वर्षात खालील घटकांसाठी त्यापुढे नमूद रकमेच्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

१) नवीन सिंचन विहिर:- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.४ लाख, २) जुनी विहीर दुरुस्ती:- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.१ लाख ३) शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण:-

उच्चतम अनुदान मर्यादा: राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याच्या आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा रु.२ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. ४) इनवेल बोअरिंग:- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.४० हजार ५) वीज जोडणी आकार:- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.२० हजार किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. ६) पंपसंच (डिझेल/विद्युत) (डिझेल इंजिन-नवीन बाब):- उच्चतम अनुदान मर्यादाः १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचाकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९० टक्के किंवा रु.४० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.७) सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी):- उच्चतम अनुदान मर्यादा: प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९० टक्के किंवा रु.५० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. ८) एचडीपीई / पीव्हीसी पाईप (नवीन बाब): उच्चतम अनुदान मर्यादा: अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या योजनेंतर्गत प्रति मीटरकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १०० टक्के किंवा रु.५० हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. ९) सूक्ष्म सिंचन संच:- ९.१) तुषार सिंचन संच पूरक अनुदान:- उच्चतम अनुदान मर्यादा: प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत १) अल्प/अत्यल्प भूधारकांसाठी ५५ टक्के + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५ टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १० टक्के तसेच २) बहू भूधारकांसाठी ४५ टक्के मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३० टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १५ टक्के किंवा रु.४७ हजार या पैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत)९.२) ठिबक सिंचन संच पूरक अनुदान:- उच्चतम अनुदान मर्यादा: प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत १) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५ टक्के + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५ टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १० टक्के तसेच २) बहू भूधारकांसाठी ४५ टक्के मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३० टक्के + डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून १५ टक्के किंवा रु.९७ हजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) १०) यंत्रसामुग्री (वैलचलित / ट्रॅक्टर चलित अवजारे-नवीन बाब):- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.५० हजार ११) परसबाग (नवीन बाब):- उच्चतम अनुदान मर्यादा: रु.५ हजार या योजनेंतर्गत ११ बाबी अंतर्भूत असून लाभ पॅकेज स्वरुपात खालीलप्रमाणे दिला जातो.

**नवीन विहीर पॅकेज**

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंपसंच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी). एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु.६ लाख ४२ हजार / रु. ६ लाख ९२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (विहीर रु.४ लाख + इनवेल बोअरिंग रु.४० हजार + वीज जोडणी आकार - रु.२० हजार + विद्युत पंप संच/डिझेल इंजिन रु.४० हजार किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी) रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु. रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार रु.६ लाख ४२ हजार /रु.६ लाख ९२ हजार)

**जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज:**

जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, विद्युत पंप संच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु.३ लाख ४२ हजार/रु.३ लाख ९२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (जुनी विहीर दुरुस्ती - रु.१ लाख + इनवेल बोअरिंग रु.४० हजार + वीज जोडणी आकार - रु.२० हजार + विद्युत पंप संच/डिझेल इंजिन रु.४० हजार किंवा सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी) रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप. रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार रु.३ लाख ४२ हजार /रु.३ लाख ९२ हजार).

**शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज:**

शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, विद्युत पंप संच / डिझेल इंजिन, सोलर पंप (वीज जोडणी व पंप संच ऐवजी), एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, यंत्रसामुग्री व परसबाग या घटकांसह एकूण रु. ४ लाख ०२ हजार /रु.४ लाख ५२ हजार एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. (शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण रु.२ लाख + वीज जोडणी आकार रु. २० हजार + विद्युत पंप संच / डिझेल इंजिन- रु.४० हजार किंवा सोलार पंप (वीज जोडणी व पंपसंच ऐवजी रु.५० हजार + एचडीपीई/पीव्हीसी पाईप रु.५० हजार + तुषार सिंचन संच रु.४७ हजार किंवा ठिबक सिंचन संच रु.९७ हजार + यंत्रसामुग्री रु.५० हजार + परसबाग रु.५ हजार = रु.४ लाख ०२ हजार/रु.४ लाख ५२ हजार)

**लाभार्थी पात्रतेचे निकष:**

* लाभार्थी अनुसूचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील. * शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. * शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्राबाहेरील) * लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते असणे व ते बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे. * दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील. * या योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१ लाख ५० हजार /- वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६.०० हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल मात्र, लाभार्थ्याची जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हेक्टर पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हेक्टर इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हेक्टर धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही. * एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील. * अशाच स्वरुपाच्या कृषीविषयक विकास योजनेकरिता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या ङउ- व घटनेच्या कलम २७५ (-) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही. * या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलचे ाहहवर्ली.ाहहरीहीीर.र्सेी.ळप/षरीशी/ श्रेसळप/श्रेसळप या संकेतस्थळावर शेतकऱ्यांचे अर्ज मागविण्यात येत असून अधिक माहितीसाठी पंचायत समिती येथील कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर यांनी केले आहे.

**- मनोज सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**



## बदलते तंत्रज्ञान

# कारमधील एअरबॅग कशा कार्य करतात?

एअरबॅग हे सहसा पॉलिस्टरसारख्या मजबूत कापड किंवा फॅब्रिकपासून बनवलेले फुग्यासारखे आवरण (कवर) असते. अपघाताच्या वेळी प्रवाशांना सुरक्षित ठेवण्यासाठी याला खास मटेरियलने डिझाइन केले असते. हे कारमधील सेफ्टी कुशनप्रमाणे काम करते. वाहनाला कोणताही आघात किंवा टक्कर होताच ही यंत्रणा सक्रिय होते.



एअरबॅगला सप्लिमेंटरी रेस्ट्रेंट सिस्टम असेही म्हणतात. अपघात होताच एसआरएस प्रणालीमध्ये आधीच स्थापित केलेला नायट्रोजन वायू एअरबॅगमध्ये भरला जातो. ही संपूर्ण प्रक्रिया काही मिलिसेकंदात घडते. यानंतर एअरबॅग फुगते आणि प्रवाशांना उत्तम कुशनिंग (गादी) देऊन सुरक्षितता प्रदान करते.

एअरबॅगमध्ये जे छिद्र दिले जातात ते एअरबॅग उघडल्यानंतर गॅस सोडतात. या सर्व प्रक्रियेत वाहनांच्या शरीराच्या मजबुतीचीही काळजी घेतली जाते, जेणेकरून कोणत्याही अपघाताच्या वेळी, कारमध्ये बसलेल्या व्यक्तीला जास्त नुकसान होणार नाही आणि वाहन स्वतःच जास्तीत जास्त धोका सहन करू शकेल, यासाठी कारचे शरीर मजबूत धातूचे बनलेले असते.

अपघाताच्या तीव्रतेनुसार एअरबॅग किती वेगात उघडते हे एअरबॅग कंट्रोल युनिट (ACU)द्वारे निर्धारित केले जाते. अपघात झाल्यास क्रॅश सेन्सर (एक्सेलेरोमीटर) एअरबॅग कंट्रोल युनिटला सिग्नल पाठवतो. हे कंट्रोल युनिट इन्फ्लेशन डिव्हाईस सक्रिय करते, जे एअरबॅगमध्ये भरलेले सोडियम झाइड (NaN३) आणि पोटॅशियम नायट्रेट (KNO3) यांचे मिश्रण प्रज्वलित करून नायट्रोजन वायू तयार करते. एअरबॅग उघडण्याची सामान्य वेळ सुमारे ३० ते ५० मिलीसेकंद असते. सामान्य कार अपघाताची प्रक्रिया सुमारे १२० मिलीसेकंद चालते. डोळे मिचकावयला सुमारे १०० ते १५० मिलीसेकंद लागतात. सरासरी व्यक्ती एका मिनिटात १४ ते १७ वेळा डोळे मिचकावते. संगणक वापरताना किंवा काहीतरी वाचताना हा वेग कमी होतो आणि व्यक्ती एका मिनिटात ४ ते ६ वेळा डोळे मिचकावते. कारमध्ये मुलांना त्यांच्या वयानुसार बसण्याची व्यवस्था केली जाते. उदाहरणार्थ, लहान मुलांना कधीही पुढे बसवू नये. कारण त्यांच्या शरीराचे अवयव नाजूक असतात आणि कोणतीही दुर्घटना घडल्यास एअरबॅग उघडणे त्यांच्यासाठी धोकादायक ठरू शकते.

नऊ किलोपेक्षा कमी वजनाच्या मुलांनी नेहमी मागच्या सीटवर बसवावे. त्यांचा चेहरा मागील सीटच्या दिशेने असावा आणि त्यांना ISOFIX चाइल्ड सीटवर बसवले पाहिजे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिला शिक्षण आणि समाजसुधारणेचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची आज १९४वी जयंती आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य १८व्या शतकात समाजाचा मोठा विरोध पत्कारत स्त्री-शिक्षणासाठी केलेल्या कार्यासाठी ओळखले जाते. सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे ३ जानेवारी १८३१ रोजी सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. सावित्रीबाई या ९ वर्षांच्या असताना इस १८४०मध्ये त्यांचा विवाह १३वर्षे वयाच्या महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला. लहानपणापासून ज्योतिबांना जातीयतेचे चटके बसले होते. अस्पृश्याचे हाल पाहून ज्योतिबांचे काळीज पिळवटून निघत असे. अशा अमानुष रुढी-परंपरा व कर्मकांडाविरुद्ध ज्योतिबांचे मन पेटून उठले. ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतिला प्रज्वलीत करण्याचे कार्य सावित्रीनेच केले व ती खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत झाली. शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले.



## निमित्त

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. त्यानंतर महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी ज्योतिरावांचे आजारपणात निधन झाले. अत्यंयात्रेच्यावेळी जो टिटवे धरतो त्याला वारसा हक्क मिळत असल्याने ज्योतिरावाचे पुतणे आडवे आले आणि ज्योतिरावांचा दत्तक पुत्र यशवंतरावांना विरोध करू लागले. त्यावेळेस सावित्रीबाई धैर्याने पुढे आल्या व स्वत: टिटवे धरले. अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालल्या आणि स्वत:च्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यशवंतराव हा विधवेचा मुलगा असल्याने त्याला कुणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. तेव्हा कार्यकर्ता ज्ञानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या राधा नावाच्या मुलीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी विवाह यशवंतचा करून दिला. हाच महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय.

१८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला

१८९६-९७ दरम्यान पुणे व परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेत होता. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईचा जन्मदिन हा बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंना ज्ञानज्योती, क्रांतिज्योती या टोपण नावाने देखील ओळखले जाते.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# गरोदरपणाची 'ही' लक्षणं जाणून घ्या...

आई होणं हे कुठल्याही महिलेसाठी सर्वात सुंदर भावना आहे. प्रत्येक स्त्रीसाठी गरोदर राहणे ही भाग्याची बाब समजली जाते. जर एखादी स्त्री पहिल्यांदाच गरोदर होत असेल तर तिला त्याबद्दल फारशी माहिती नसते. या रिपोर्टच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला सांगत आहोत अशा लक्षणांबद्दल, ज्याच्या माध्यमातून तुम्ही गरोदर आहात की नाही हे जाणून घेणं सहज शक्य होऊ शकते...



गर्भधारणेच्या सुरुवातीच्या दिवसांना अर्ली प्रेग्नंसी म्हणतात. सोप्या भाषेत गर्भधारणेच्या पहिल्या १२ आठवड्यांना अर्ली प्रेग्नंसी म्हणतात. या काळात गर्भाचा विकास झपाट्याने होतो. याशिवाय शरीरात अनेक प्रकारचे बदलही होतात. पहिल्या आठवड्यात दिसलेली काही न ऐकलेली चिन्हे जाणून घेऊया.

प्रत्येक स्त्रीचा गरोदर राहण्याचा अनुभव वेगळा असतो, कारण ही भावना प्रत्येकापेक्षा वेगळी असते. बहुतेकदा स्त्रिया असा अंदाज लावतात की त्यांची मासिक पाळी चुकल्यानंतर ती गर्भवती आहेत. स्त्रीरोग तज्ज्ञांच्या मते, काही अशी लक्षणं आहेत, जी गर्भधारणेची भिन्न, परंतु सामान्य लक्षणे आहेत.

प्रत्येक वेळेस रक्तस्त्राव म्हणजे मासिक पाळी नसते. वास्तविक, जेव्हा एखादी स्त्री गरोदर असते तेव्हा तिला सुरुवातीच्या दिवसांत हलका गुलाबी रक्तस्त्राव होतो. हे तुमच्या मासिक पाळीच्या रक्तापेक्षा बरेच वेगळे आहे. यामध्ये पीरियडप्रमाणे रक्तस्त्राव होत नाही, फक्त हलके रक्त दिसते.

हार्मोनल असंतुलनामुळे योनीच्या सभोवतालचा थर जाड होतो, ज्यामुळे योनीच्या पेशी खूप वेगाने वाढू लागतात. या कारणामुळे स्त्रीला योनीतून स्त्राव होतो. मासिक पाळी चुकल्यानंतर वारंवार लघवी करणे हेदेखील तुम्ही गर्भवती असल्याचे लक्षण आहे. यामध्ये मासिक पाळीच्या अनुपस्थितीमुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते. त्यामुळे लघवीचे प्रमाण वाढते.

गर्भधारणेच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये हार्मोनल बदल होतात. या बदलांमुळे स्तनांमध्ये एक प्रकारचा जडपणा जाणवतो, मात्र गर्भधारणेदरम्यान काही काळानंतर ही समस्या दूर होते. जर एखादी स्त्री गरोदर असेल तर तिला काही खाद्यपदार्थांचा वास खराब वाटू शकतो आणि काही गोष्टींचा वासही चांगला असू शकतो, ज्या चांगल्या नसतील. काही स्त्रियांच्या बाबतीत असंही घडतं की, त्यांना आधी आवडलेल्या गोष्टी वाईट वाटू लागतात आणि न आवडलेल्या गोष्टी आता त्यांना आवडतात.

# कर्जत बाजारपेठेत पहाटे अग्नितांडव

## कपड्याचे दुकान जळून खाक, लाखो रुपयांचे नुकसान

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत बाजारपेठेत गुरुवारी पहाटेच्या सुमारास अग्नी तांडव पाहायला मिळाले.आगीत कपड्याचे दुकान पूर्णपणे जळून खाक झाले असून दुकान मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

कर्जत टिळक चौकातील बाजारपेठेत असणाऱ्या मयुरा हॉटेल समोर सद्भावना इमारतीत दर्शन कलेक्शन या कपड्याच्या दुकानाला पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली.पहाटेच्या सुमारास ही आग लागल्याने परिसरात सामसूम होती,सर्वप्रथम आग दुकानाच्या आतील बाजूस लागल्याने आगीचे व धुराचे लोट बाहेर पडण्यास उशिरा सुरुवात झाली,यामधे दुकानातील कपडे , फर्निचर पूर्णतः जळून खाक झाले दरम्यान आगीच्या धुराचे लोट पहाटेच्या सुमारास जाणाऱ्या कामगार वर्गांना दिसताच घटना उघडकीस आली.

कालूसिंग राजपुरोहित हे गेली १५ वर्षे कर्जत येथे वास्तव्यास असून त्यांचे मालकीचे हे दुकान होते.१२ वर्षे ते दर्शन कलेक्शन या नावाने दुकान चालवीत असून,त्यांच्या दुकानाला लागलेल्या आगीत ३५ लाखांचे नुकसान झाल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.दरम्यान आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, प्राथमिक तपासानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच कर्जत अग्निशमन दलाची वाहने घटनास्थळी दाखल झालीवेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने बाजूला असणारे दुकाने आगी पासून सुरक्षित राहिली

# रोठ बुद्रुक येथे रास्त भाव दुकानाच्या इमारतीचे उद्घाटन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक येथे गुरुवारी (दि. २) रोजी गावातील नागरिकाना आपल्या गावातच रास्त भाव रेशन मिळावे यासाठी धाटाव औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात डिएमसी सामाजिक बांधिलकी जोपासत कंपनीच्या सीएसआर फंडातून गावाला उत्तम दर्जाची इमारत बांधून दिली.



डएमसी कंपनीचे साईट हेड किरण हिंगणे यांनी या वेळी बोलताना सांगितले की, गावातील गोरगरीब गरजवंतांना आपलाच गावात मोफत असणारे शासनाच्या दिले जाणारा धान्य मिळावं तसेच या गावाशी नेहमीच नागरिकांशी आता हे कंपनीच्या दृष्टीने सलोख्याचे असल्याने कंपनीच्या सीएसआर फंडातून इमारत बांधून देण्यात आली. त्यामुळे निश्चितच गावाचा विकास हा निश्चित होईल त्याचबरोबर कंपनीला भेटणारे आशीर्वाद हे कंपनीसाठी निश्चितच प्रगती दायक असतील. भविष्यात गावाला डिएमसी कंपनीचे विशेष सहकार्य राहील असे किरण हिंगणे म्हणाले, तर सरपंच नितीन वारंगे यांनी बीएमसी कंपनीचे विशेष आभार मानले.

या वेळी कंपनीचे यच आर मॅनेजर अनिल जांभळे, राकेश खांडेकर, केतन पवार तसेच ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, तंटामुक्त अध्यक्ष दिलीप वारंगे, राजेश डाके, खेळु वारंगे, निलेश वारंगे, मंगेश देवकर, दत्ता डाके, विनोद बाईत, संदीप बाईत, गणेश साळुंखे, महेश खांडेकर , रमेश मोरे यासह ग्रामपंचायत ग्रामसेवक अलंका बामगुडे व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्ह्यातील निर्यात प्रचालन कार्यशाळा सोमवार (दि. ६) रोजी सकाळी ९.३० वा.नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या यांनी दिली आहे.

राज्यामध्ये निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनवण्यासाठी राज्याकडून केंद्र शासनाच्या जिल्हा हे निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्यात प्रचालन कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे.

कार्यक्रमास सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यात संबंधित घटक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


### पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६
### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील **मौजे – पिसार्वे** या महसूली गावातील सर्व्हे नं. १२९ लगतचा प्रस्तावित २४.०० मी. रस्त्यापासुन ते मौजे तळोजे मजकूर या महसूली गावातील सर्व्हे नं. ५२ मधील विद्यमान रस्त्यापर्यंत १८.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५, २०६, २०७ व २०९ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजना रस्त्याने बाधीत तसेच ना–बांधिव क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी. आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन **मौजे – पिसार्वे** , ता. पनवेल येथील श्री. मुरजी भानजी गामी यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित १८.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत तसेच ना– बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :–

१) मौजे– पिसार्वे, सर्व्हे नं. ८१/१/ब/२, ८१/१/ब/३, ८१/१/ब/४
रस्त्यासाठी बाधीत व ना–बांधिव क्षेत्र २०५५.५१ चौ. मी.
त्यास मोजणी नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे –
पुर्वेस : सर्व्हे नं. ८१
पश्चिमेस : सर्व्हे नं. १२५, ८३
दक्षिणेस : हिस्सा नं. ९
उत्तरेस : सर्व्हे नं. ८१

टिप :– उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

सहाय्यक संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

दिनांक :३०/१२/२०२४

जा क्र. – पमपा/नरवि/टिडीआर/२६–२४/२९४६ /२०२४
टिप – सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.



### चौकशीची जाहीर नोटीस

जा.क्र. न्यायशाखा /४/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग अलिबाग
कल्पतरू इमारत मुख्य पोस्ट ऑफिस जवळ, अलिबाग, जि. रायगड
०१/०१/२०२५

**बदल अर्ज क्र.** ACC/673/2024
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :– **अंजुमन फर्जन्दान–ए–तोहिद एज्युकेशनल अँन्ड वेल्फेअर ट्रस्ट, पारपुंड, ता. पनवेल, जि.रायगड**
न्यासाचा नोंदणी क्रमांक :– **ई–१२५० (रायगड)**

अर्जदार :– आरीफ बाबामियाँ कुरेशी, रा. पळस्पा फाटा, पारपुंड, ता. पनवेल, जि. रायगड
सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड, हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुदयांवर चौकशी करणार आहेत.
खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ. स्थावर मिळकत :– (वर्णन)**
**मौजे कोळखे–पारपुंड, ग्रामपंचायत कोळखे, ता. पनवेल, जि. रायगड येथील स्थावर मिळकत**

| मौजे | मालमत्ता घर क्र. | क्षेत्र (चौ. फुट) बांधीव |
|---|---|---|
| कोळखे पारपुंड | १९५ | २८० चौ. फुट तळमजला |
| कोळखे पारपुंड | १९५अ | २८० चौ. फुट पहिलामजला |
| कोळखे पारपुंड | १९५ब | ४२० चौ. फुट बैठे घर |

मिळकतीची एकूण रक्कम ५,००,०००/–
(अक्षरी पाच लाख मात्र)
वरील मिळकतीच्या चर्तुसिमा येणेप्रमाणे :
पुर्व : रहदारीचा रस्ता
पश्चिम : ईस्माईल शेख यांचे घर
उत्तर : अहमद ईब्राहिम यांचे घर
दक्षिण : मस्जिद मदरसा प्रॉपर्टी

**ब. स्थावर मिळकत (वर्णन)**
**मौजे कोळखे–पारपुंड, ग्रामपंचायत कोळखे, ता. पनवेल, जि. रायगड येथील स्थावर मिळकत**
**विनामोबदला बक्षिसपत्र**

| मौजे | मालमत्ता घर क्र. | क्षेत्र (चौ. फुट) बांधीव |
|---|---|---|
| कोळखे पारपुंड | २२४ | १०६४ चौ. फुट बैठे घर |
| कोळखे पारपुंड | २१२ | २३८ चौ. फुट बैठे घर |
| कोळखे पारपुंड | २१२ अ | ६०८ चौ. फुट बैठे घर |

मिळकतीची एकूण रक्कम बाजार मुल्य ३०,६९,५००/– (अक्षरी तीस लाख एकोणसत्तर हजार पाचशे मात्र)
वरील मिळकतीच्या चर्तुसिमा येणेप्रमाणे :
पुर्व : रहदारीचा रस्ता
पश्चिम : ईस्माईल शेख यांचे घर
उत्तर : मस्जिद मदरसा प्रॉपर्टी
दक्षिण : रहदारीचा रस्ता

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल. व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व. मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०१/०१/ २०२५ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधीक्षक (प्र)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे– कर्नाळा, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणे:

**– मिळकतीचे वर्णन–**
**मौजे– कर्नाळा, ता–पनवेल, जि–रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| कर्नाळा | श्री. दौलत शिवाजी थोरात<br>श्री. नरेंद्र मल्हारी पाटील | १२ | १/ब/२ | ०.७२.०० हे. आर. पॉ पैकी ०.३६.०० हे. आर. पॉ | १.६२ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नर येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०२/०१/२०२५**

सही/–
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
पत्ता– शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर–५, नवीन पनवेल, ४१०२०६



### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय
### रायगड, महाराष्ट्र शासन

**खरीप पणन हंगाम २०२४–२५ व २०२५–२६ साठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान/सीएमआरच्या वाहतूकीचे दर निश्चतीसाठी ई–निविदा सूची**

जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र शासन, अनुभवी निविदाधारकांना स्पर्धात्मक बोली प्रस्तावांना प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत.

तपशिलवार निविदा दस्ताऐवजासाठी इच्छुक बोलीदारांनी http://www.mahatenders.gov.in व www.raigad.gov.in या वेबसाईटवर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदा फॉर्म विक्री निविदेत सहभागी होण्यासाठी संगणकीय नोंदणी करुन आवश्यक कागदपत्र अपलोड करण्याचा कालावधी दिनांक ०३/०१/२०२५ ते दि. २३/०१/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यत पर्यत आहे.

सही/–
(किशन ना. जावळे)
अध्यक्ष
वाहतूक दर निश्चिती जिल्हास्तरीय समिती
तथा जिल्हाधिकारी रायगड

**दिनांक : ०३/०१/२०२५**
**क्र.जिमाका/राअ/जाहि/१९६६/२०२४–२५**



### ग्रुप ग्रामपंचायत आसरे ता. खालापूर जि. रायगड
जाहीर निविदा नोटीस

मौजे आसरे ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर १५ वा वित्त आयोग/ग्रामनिधी/ योजनेतून मंजूर काम करणेकरिता खुली निविदा खालील तपशिला नुसार स्थानिक नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहे.

**निविदा प्रसिध्द कामाचा तपाशील खालील प्रमाणे**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकी य रक्कम | बयाना रक्कम | मुदत कामाची |
|---|---|---|---|---|
| १ | आसरे येथे पंप हाऊस सुरदुस्ती करणे. | १४९९३१/– | १४९९/– | ३ महीने |
| २ | धारणी आदिवासी वाडी येथे पाईपलाईन, चबुतरा सिंटेक्स टाकी बसविणे. | २५५९४३/– | २५५९/– | |
| ३ | ग्रुप ग्रा.प. आसरे हद्दीतिल पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे क्लोरीकरन करणे (टीसीएल/मेडिक्लोर खरेदी करणे.) | ९८७७०/– | ९८७/– | |
| ४ | ग्रुप ग्रा.प. आसरे हद्दीत कचरा कुंड्या खरेदी करणे. | ५००००/– | ५००/– | |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालय मध्ये खुर्ची/टेबल/कपाट खरेदी करणे. | ३०००००/– | ३०००/– | |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय मध्ये कारपेट बसविणे, | १०००००/– | १०००/– | |
| ७ | अंगणवाडी सेविका /आशा सेविका यांना दफ्तर नमुने पुरविणे. | ५००००/– | ५००/– | |
| ८ | ग्रुप ग्रा.प. आसरे हद्दीतिल रा.जि.प. शाळा दरवाजे खिडक्या दुरूस्ती करणे. | ५००००/– | ५००/– | |
| ९ | १५% मागासवर्गीय कल्याण अंतर्गत वाडी / वस्ती साठी सार्वजनिक साहित्य पुरविणे | १७७०६०/– | १७७०/– | |
| १० | १०% महिला व बाल कल्याण अंतर्गत अंगनवाडीस आवश्यक भौतिक साहित्य पुरविणे | ७१७०५/– | ७१७/– | |
| ११ | धारणी, आसरे येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे. | ३०००००/– | ३०००/– | |

१. सदर कामाबाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल.
२. शिलबंद निविदा दिनांक–०३/०१/२०२५ ते दिनांक ०८/०१/२०२५ या कालावधीनंतर सकाळी ११ ते ३ या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येईल. दिनांक–०९/०१/२०२५ रोजी अथवा इतर दिवशी शिलबंध निविदा फोडण्यात येईल.
३. मुदतीनंतर आलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही.
४. शासकीय नियमाप्रमाणे, आयकर, सेवाकराचे रक्कम कपात करण्यात येईल.
५. विकास कामाच्या बिलाचे एकूण रकमेपैकी पाच टक्के रक्कम ही काम पूर्ण झाल्याच्या दिनांक पासून सहा महिने कालावधीसाठी सुरक्षा अनामत म्हणून कपात करण्यात येईल.
६. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सूचनेचा बदल करण्याचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत आसरे ने राखून ठेवला आहे.
७. अंदाजपत्रकात ठरवून दिलेल्या तपशीला प्रमाणे साहित्य वापर करणे बंधनकारक राहील,
८. काही अपरिहार्य कारणास्तव बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.

**टिप–नोटिस बोर्ड वर प्रशिध्द केली असे.**

**दि. ०२/०१/२०२५**

सही/–
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत आसरे,
ता. खालापूर जि. रायगड

सही/–
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत आसरे,
ता. खालापूर जि. रायगड



### पनवेल महानगरपालिका, पनवेल
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान**
**शक्तीशाली शहरस्तर संघ, पनवेल**
**शहर उपजीविका केंद्रातील कंत्राटी तत्वावरील पद भरतीची**
**जाहिर सुचना**

| अ. क्र. | पद संख्या | पदाचे नाव | पात्रता | अनुभव | वयोमर्यादा | प्रतिमाह ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | व्यवस्थापक (महिला) | १. पदवीधर<br>२. MS-CIT किंवा तत्सम कोर्स पूर्ण | अ) आधार केंद्र, सेतु सेवाकेंद्र, सेवा केंद्र, विविध विक्री सेवा केंद्र, अशा क्षेत्रातील किमान ४ वर्षाचा अनुभव<br>आ) व्यवस्थापन, कौशल्य व उपजीविका, सामाजिक विकास, अशा क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात यावे,<br>भाषा – मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा लिहिता, वाचता, बोलता येणे.<br>कोशल्ये संवाद, व्यवस्थापन, संगणकीय ज्ञान, – समुपदेशन इ. | २५ ते ४५ | १२०००/ |
| २ | १ | सहाय्यक (बहु उद्देशीय / Multi Tasking) | १) बी. कॉम / बी.बी.ए TALLY ERP ९ असल्यास प्राधान्य | किमान २ वर्षाचा कार्यालयीन व्यवस्थापनाचा किंवा अर्कोटट म्हणून अनुभव<br>भाषा – मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा लिहिता, वाचता, बोलता येणे.<br>कौशल्ये उत्तम संवाद, संगणकीय ज्ञान, इंटरनेट, – समुपदेशन इ. | २२ ते ३५ | १००००/ |

**वरील पदांसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे :**
१. ओळखपत्र
२. रहिवासाचा पुरावा
३. शैक्षणिक / टेक्निकल प्रमाणपत्रे
४. अनुभवाची प्रमाणपत्रे

**अटी व शर्ती :**
१) सदर नियुक्ती ही ११ महिन्या करिता ठोक मानधन तत्वावर मर्यादित असेल.
२) नियुक्ती बाबत चे सर्व अधिकार हे मा. शहर प्रकल्प अधिकारी तथा उप आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्याकडे राखीव ठेवण्यात आलेले आहेत.
३) सदर नियुक्ती ही मुलाखत प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे.
४) सेवा कालावधी मध्ये ठोक मानधन वगळता इतर कोणताही खर्च अभियान कक्षाद्वारे देय राहणार नाही.
पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज पोस्टाद्वारे किंवा समक्ष दि.१०/०१/२०२५ पर्यंत खालील पत्यावर संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सादर करायचे आहेत.

**पत्ता – दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष (DAY NULM$^{2}$) पनवेल महानगरपालिका बळवंत फडके नाट्यगृहच्या माणे, श्री दत्त झेरॉक्स च्या वरती, दुसरा मजला**

सही/–
प्रार्थना वाघे
अध्यक्ष
शक्तीशाली शहर स्तर संघ, पनवेल

जा.क्र.पमपा/DAY-NULM/ CLC-४७२५/प्र.क्र १ /१/२०२४
दिनांक ०२/०१/२०२५



मा. बीडकर मॅडम

**ॲड. आशा अरुणकुमार भगत ८१०८३५५०००**
**ॲड. हेमंतकुमार शंकर भगत ९९३०९९३००९**

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दि.चौ. अर्ज क्र. १७४९/२०२४**
**नि. ८**
**ने.ता. १८/०२/२०२५**

१. कुमारी केशर गणपत कोळी
वय ६२ वर्षे धंदा–घरकाम
दोघी रा मु–कोंबडभुजे पो उलवा,
ता. पनवेल जि. रायगड .... अर्जदार

१. सदरहू अर्जदार हिने सदरचा चौकशी अर्ज वारस दाखला मिळणेकरिता मे न्यायालयात दाखल केलेला आहे.
२. सदरहू अर्जदार हिचे वडिल कै. गणपत लक्ष्मण कोळी हे दिनांक २९/०७/२०२४ रोजी मौजे कोंबडभुजे पो. उलवा ता. पनवेल येथे मयत झाले आहेत व कै. गणपत लक्ष्मण कोळी यांची आई कै. काशीबाई लक्ष्मण कोळी या साधारणपणे सन १९४० मध्ये मौजे कोंबडभुजे येथे मयत झालेल्या आहेत त्याबाबत अर्जदार हिने दिनांक ०५/०२/२०२१ रोजी पनवेल येथिल में दुसरे सहदिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर यांचे कडुन दि चौ अर्ज क्रमांक १०८३/२०१९ असा वारस दाखला घेतलेला आहे. परंतु अर्जदार यांची आई देउबाई गणपत कोळी या दिनांक १९/०९/२०२४ रोजी शिवाश्रय आधारघर मु उसर्ली बुद्रुक तालुका पनवेल येथे मयत झालेल्या आहेत. कै. देउबाई गणपत कोळी यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. देठबाई गणपत कोळी यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरह अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे–

कै. गणपत लक्ष्मण कोळी (मयत मुळ पुरुष)
↓
कै. काशीबाई कक्ष्मण कोळी (मयत मुळ पुरुषाची आई)
↓
कै देउयाई गणपत कोळी(मयत मुळ पुरुषाची मयत पत्नी)
↓
कुमारी केशर गणपत कोळी (मुलगी)

३. सदरहु कै. देउबाई गणपत कोळी यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असणा–या खालील वर्णनाच्या जमिनी सरकार तर्फे सिडकोने 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे योजनेकरीता भुसंपादन केलेल्या आहेत. सदरहु जमिन मिळकती.
१) शासन निर्णय नगर विकास क्रमांक सी.आय.डी.१८१२/प्रकं. २७४/नवि–१० दिनांक ०१/०३/२०१४
२) शासन निर्णय महसुल व वन विभाग क एलक्युएन–०५/२०१४/प्र. क.३९–अ–२ दिनांक १६ जुन २०१४
३) (शासन निर्णय महसुल व वन विभाग क आरपीए २०१४ / प्र.क.५२–ए–३ दिनांक २५ जुन २०१४
४) सिडकोचे परिपत्रक क्र सिडको/व्य.सं./आदित/२०१४ दिनांक १९/०९/२०१४ अन्वये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्पाकरीता स्थलांतरीत होणा–या बांधकामाबद्दल संबंधीत पात्र बांधकामधारकांस पुर्नस्थापनेसाठी देण्यात येणा–या भुखंडांचे वर्णन येणेप्रमाणे

**जमिन मिळकतींचे वर्णन यूनिट केस क्रमांक KOM-ICIG-६**
**मौजे तरघर–कोबंडभुजे, ता. पनवेल, जि. रायगड येथिल बिननंबरी गावठाणमधील जमिन**

| | | |
|---|---|---|
| १) | भुधारकाचे / बांधकामधारकाचे नाव | गणपत लक्ष्मण कोळी |
| २) | संयुक्त मोजणीनुसार भुधारकाच्या ताब्यामधील व वहिवटी खालील क्षेत्र (चौ मी) | – |
| ३) | जमिनीवर इमारत असल्यास संयुक्त मोणीनुसार इमारत क्रमांक | – |
| ४) | सर्वेक्षणानुसार बांधकाम / इमारत क्रमांक | KB–११५ |
| ५) | ग्रामपंचायत घर क्रमांक | ४६ अे |
| ६) | बांधकामाचा प्रकार | इमारत |
| ७) | बांधकामाचे वापर | निवासी |
| ८) | बांधकामाचे मजले | – |
| ९) | बांधकामाच्या पायाचे / मजल्यासह बनुझेय बांधीव क्षेत्र (चौ.मी.) | १२.४८ |
| १०) | बांधकामाच्या छपराखालील अनुक्षेय क्षेत्र चौ.मी. | १४.०४ |

सदरहू जमिन मिळकत ही कै. गणपत लक्ष्मण कोळी व कै देउबाई गणपत कोळी वगैर यांच्या नावे होती व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदाराने सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे भुखंड मिळालेला आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. देउबाई गणपत कोळी यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

सही/–
क. लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सह. अधीक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

## निवडक

### ‘रोटरी’तर्फे पुरस्कार सोहळा



**नवी मुंबई :** रोटरी क्लब व्हॅली गोल्फर्सतर्फे छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेच्या जिजाई बालमंदिर ठाणे शाळेच्या मुख्याध्यापिका ऋतुजा रवींद्र गवस यांना वोकेशनल एक्सलेन्स पुरस्कार २०२४-२५ देवून गौरविण्यात आले. तसेच विवेकानंद संकुल सानपाडा शाळेतील शिक्षिका गीता रावत व संध्या ठाकूर यांना रोटरी नेशन बिल्डर पुरस्कार २०२४-२५ देऊन गौरविण्यात आले. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्तम कामगिरीबद्दल विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी नवी मुंबई येथे ३१ डिसेंबर २०२४ तिघींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम

**नवी मुंबई :** महापालिकेमार्फत दरवर्षी ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती दिन नानाविध उपक्रम राबवून उत्साहाने साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने रांगोळी स्पर्धा, योगासने, नृत्य व गायन घेण्यात आल्या असून पाककला, सॅलेड सजावट व टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे या स्पर्धा ३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी घेण्यात येणार आहेत. कार्यक्रमात विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहेत. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिला / महिला मंडळे / महिला बचत गट यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे जाहीर आवाहन नवी मुंबई महापालिकेने केले आहे.

# बेकायदा बांधकामांचे निष्कासन

## सिडकोकडून अतिक्रमणमुक्त मोहिमेंतर्गत कारवाई

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखालील नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई व नैना) विभागातर्फे सन २०२४ मध्ये सिडको अधिकारक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध धडक मोहिमा राबवून २,१०२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली व २,०६,४३१ चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले.



नवी मुंबईसारख्या सुनियोजित शहराच्या विकासामध्ये अडथळा ठरणारी व शहराला विद्रुपीकरण करणारी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही सिडकोतर्फे नियमितपणे पार पाडण्यात येते.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने सन २०२४ या वर्षामध्ये ५४७ निष्कासन मोहिमांचे आयोजन करून ३०२ यशस्वी मोहीमांदरम्यान सिडको संपादित जमिनींवरील २,१०२ अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित केली. निष्कासित करण्यात आलेल्या बांधकामांमध्ये कच्ची बांधकामे, आरसीसी बांधकामे, टपऱ्या इ. समावेश होता. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी २,१६० अनधिकृत बांधकाधारक/अतिक्रमणधारकांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा बजावून बांधकाम निष्कासित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या मोहींमादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्थानकांतील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी वेळोवेळी योग्य तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला.

नवी मुंबई क्षेत्रामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू (एमटीएचएल), उलवे सागरी मार्ग, नवी मुंबई मेट्रो, सिडकोचे गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्यात आले असून व इतर पायाभूत सुविधा प्रकल्प नियोजित किंवा प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर, नवी मुंबईचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील लौकिक अधिक वृद्धींगत होत असताना अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांमुळे शहराच्या विकासाला बाधा येऊ नये याकरिता अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामांविरुद्ध आयोजित करण्यात येणाऱ्या या मोहिमा महत्त्वाच्या ठरतात.

निष्कासन मोहिमांव्यतिरिक्त, नागरिकांना सावध करण्याकरिता सिडकोतर्फे अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसा वेळोवेळी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच नागरिकांनी नवी मुंबई किंवा नैना क्षेत्रामध्ये सदनिका किंवा दुकाने खरेदी करताना संबंधित बांधकामाबाबतची कागदपत्रे तपासावीत व संभाव्य आर्थिक फसवणूक टाळावी, असे आवाहनही सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

### युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत पनवेलमध्ये ११७ जणांची नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतपैकी ६९ ग्रामपंचायतमध्ये ६९ जणांची आणि पंचायत समितीत वेगवेगळ्या डिपार्टमेंटमध्ये ४८ अशा ११७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते ग्रामपंचायत, पशु विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण, पनवेल पंचायत समिती, आरोग्य केंद्र या ठिकाणी कार्यरत आहेत.

या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना आठ हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. यापैकी ६९ जण ग्रामपंचायतमध्ये, सहा जण पशु विभागात, पाच जण प्राथमिक आरोग्य केंद्रात, नऊ जण पंचायत समितीत, १३ जण बांधकाम विभागात, दोन जण पाणीपुरवठा विभागात आणि इतर आरोग्य विभाग आणि आयसीडीएसमध्ये कार्यरत आहेत.

प्रत्येक युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी युवक-युवती आणि त्यांचे पालक जागरूक असतात. राज्य शासन देखील त्यांच्या रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. युवा वर्गाचे शिक्षण पूर्ण झाल्यांनतर वेळेत योग्य मार्गदर्शन आणि व्यवसाय करणाऱ्यांसाठी भांडवल उपलब्धता शासन विविध योजनांच्या माध्यमातून करून देत आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांच्यामध्ये संवाद आणि समन्वय साधून उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ आणि युवा वर्गाला रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ सुरू केली आहे.

या योजनेत बारावी उत्तीर्ण, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या युवकांना प्रशिक्षणाअंती अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच विद्यावेतन देखील मिळत आहे.

# उरण-नेरूळ-बेलापूर रेल्वेतून विनातिकीट प्रवाशांमुळे उत्पन्नात घट

**उरण : रामप्रहर वृत्त**

१२ जानेवारी २०२५ला उरण ते नेरुळ/ बेलापूर हा लोकल मार्ग सुरू होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ झाली असली तरी या मार्गावरील फुकट्या प्रवाशांची संख्याही वाढू लागली आहे. दिवसाची एक लाखांची तिकीटविक्री आता ५० हजारांवर आली असल्याची माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे.

दिवसेंदिवस या मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ होत आहे, मात्र लोकल एका तासाच्या अंतराने असल्याने याचा या प्रवासमार्गाला फटका बसत आहे. या लोकलच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी केली जात आहे. त्यासाठी थेट केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आश्वासन दिले आहे. मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनीही अशाच प्रकारचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे पुढील वर्षापासून उरण ते नेरुळ/ बेलापूर या मार्गावरील लोकल अर्ध्या तासाच्या अंतराने सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. लोकलच्या फेऱ्यांत वाढ न झाल्याने उरण शहरातून नव्याने सुरू झालेल्या एनएमएमटी बस सेवेकडे प्रवासी वळू लागले आहेत.

उरण स्थानकासह या मार्गावरील द्रोणागिरी, न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकांच्या परिसरात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी करूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. येथील उरण स्थानकानजीक झालेला भीषण अपघात आणि द्रोणागिरी स्थानकावर लोकलमधून पडलेली महिला या दोन घटना ताज्या आहेत. अपघातानंतर स्थानिक पोलिसांनीही रेल्वे विभागाकडे सीसीटीव्ही बसविण्याची मागणी केली आहे. उरण येथून प्रवास करणारे ३० टक्के प्रवासी फुकटचा प्रवास करीत असावेत, कारण परतीचे तिकीट काढणाऱ्याची संख्या कमी झाली आहे, असे उरण रेल्वे मुख्य अधीक्षक राजेश कुमार यांनी सांगितले.

# कारच्या धडकेत मुलगा गंभीर जखमी

## अपघातानंतर वाहनचालक महिलेने काढला पळ

**नवी मुंबई : बातमीदार**




कारच्या धडकेत सहा वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी ज्वेल्स ऑफ नवी मुंबईलगत घडली. या अपघातानंतर घटनास्थळी नागरिक जमले असता, चालक महिलेने मदतीच्या बहाण्याने जखमी मुलाला कारमध्ये बसवले. मात्र, काही अंतर फिरवून पुन्हा घटनास्थळी त्याला सोडून महिलेने पळ काढला.

नेरूळ परिसरात राहणारा मोहम्मद अन्सारी (वय ६) हा रस्त्यालगत चालत असताना पाठीमागून आलेल्या भरधाव कारने त्याला धडक दिली. यामध्ये त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्याठिकाणी नागरिकांची गर्दी झाली होती.

त्याचवेळी एक दुचाकीस्वार व खारघर येथे राहणारे नोहीद चौगले हेदेखील जखमी मुलाच्या मदतीसाठी थांबले होते. या वेळी महिलेने मुलाला रुग्णालयात दाखल करण्यासाठी कारमध्ये बसवले असता, चौगले व दुचाकीस्वार कारच्या पुढे रुग्णालयाकडे चालले होते. काही अंतर गेल्यानंतर त्या महिलेने कार रुग्णालयाकडे न नेता वेगळ्या मार्गाला पळवून साक्षीदारांना चकमा दिला. त्यामुळे चौगले हे पुन्हा घटनास्थळाकडे गेले असता, जखमी मुलाला त्या ठिकाणी सोडून महिला कार घेऊन पळाल्याचे समोर आले.

घटनास्थळी दाखल झालेल्या मुलाच्या वडील व इतर व्यक्तींनी त्याला रुग्णालयात दाखल केले, मात्र पायाला व शरीरावर गंभीर दुखापत असल्याने त्याला दोन ठिकाणी रुग्णालयात दाखल करून घेण्यास नकार दिला. अखेर नोहीद चौगले यांनी त्याला सायन रुग्णालयात दाखल करून घेण्यासाठी मदत केली. शिवाय घडलेल्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनाही माहिती दिली. त्यावरून अज्ञात महिला कार चालकावर मंगळवारी एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तिचा शोध घेत आहेत.

# पिरकोन येथे मोतीबिंदू शिबिर

## भाजप नेते मुकुंद गावंड यांच्या हस्ते उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

शांतीलाल संघवी इन्स्टुटूटच्या आणि पिरकोन ग्रुपग्रामपंचायत यांच्या माध्यमातून थर्टी फर्स्ट ३१ डिसेंबरच्या माध्यमातून अनोखा संदेश जाण्यासाठी मोतीबिंदू शिबिराचे उद्घाटन उरण तालुका भाजप उपाध्यक्ष भाजप मुकुंद गावंड यांच्या हस्ते करण्यात आले

कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर आणि ज्यांनी अथक परिश्रम घेतले असे माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, सरपंच कलावती पाटील, माजी सरपंच के.वाय.गावंड, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते विलास गावंड, शांतीलाल संघवी हॉस्पिटलचे प्रमुख आयोजक जितेंद्र जाधव, डॉ. कनक राज, डॉ. प्रशांत आणि त्यांच्या स्टाफने अथक परिश्रम घेतले.

मागच्या महिन्यापासून या कॅम्पमध्ये एकूण ७० जणांचे मोतिबिंदुचे ऑपरेशन मोफत करण्यात आले. नेण्याआणण्यापासून ते सर्व जेवणापासून चांगली सोय रुग्णांची केली आहे अशी सर्व माहिती रुग्णांनी दिली आहे. आजसुद्धा या कॅम्पमध्ये एकूण १५७ रुग्णांची



ओपीडी झाली. त्यापैकी एकूण ३८ रुग्ण ऑपरेशनल घेऊन गेले. सर्व उरण तालुक्यात गावोगावी आणि खेड्यापाड्यात शांतीलाल संघवी हॉस्पिटलचे कॅम्प लावण्यात आले आहेत. २००० रुग्णाचे मोफत ऑपरेशन करण्यात येतील असे शांतीलाल संघवी हॉस्पिटलने नमूद केले आहे.

उरण तालुका भाजप उपाध्यक्ष भाजप मुकुंद गावंड यांनी शांतीलाल संघवी हॉस्पिटलचे भाषणातून आभार मानले.

### व्यसनाला बदनाम करूया अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नवी मुंबईतील सानपाडा शाखेतर्फे, ’चला व्यसनाला बदनाम करूया’ अभियान राबविण्यात आले. ३१ डिसेंबर म्हणजे तरूणाने मद्यपान करण्याचा आरंभ बनले आहे. तरूणांनी व्यसनांच्या दुनियेत प्रवेश करू नये, यासाठी प्रबोधनाची आवश्यकता असते. त्याचाच एक भाग म्हणून, ’द’ दारूचा नाही, ’द’ दुधाचा अभियान राबवण्यात आले.

या अभियानांतर्गत महा. अंनिस. कडून ’नो विस्की, नो बियर, हॅपी न्यु इयर’ असा संदेश देण्यात आला. हा उपक्रम मंगळवारी सानपाडा सेक्टर ७ मधील ’कै सिताराम मास्तर उद्यान’ येथे सायंकाळी राबविण्यात आला. महा. कार्यकर्ते कॅप्टन सी. जे. लेपांडे, राजेंद्र पंडीत व अशोक निकम यांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला.


### क्लिक...क्लिक...!



**मुरूड : भातशेती आटोपली की काही जण वीटभट्टी व्यवसाय सुरू करतात. हा व्यवसाय फार कष्टाचा आहे. वीटभट्टीसाठी माती मळताना टिपलेले खारआंबोलीचे शेतकरी.** (छाया : सुधीर नाझरे)

# भारतीय स्त्रियांच्या उद्धारक सावित्रीबाई फुले

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती. त्यांनी सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. स्त्री शिक्षणाचे महत्त्व त्यांनी त्या वेळी जाणले होते. स्त्री शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या दूरदृष्टीची आज त्यांच्या जयंतीनिमित्ताने नोंद घेतानाच त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांना नव्याने मोठी गती देण्याची गरज निर्माण झाली आहे.



**सामाजिक कार्य**

सावित्रीबाई यांनी १८५२मध्ये महिलांना त्यांचे हक्क, सन्मान आणि सामाजिक समस्यांबद्दल शिक्षित करण्यासाठी महिला सेवा मंडळ सुरू केले. विधवांच्या मुंडणाच्या प्रथेला विरोध करण्यासाठी त्यांनी मुंबई आणि पुण्यात संपही केला होता. १८७३मध्ये ज्योतिरावांनी सत्यशोधक समाज नावाच्या सामाजिक सुधारणा समाजाची स्थापना केली. सावित्रीबाई त्याच्या सक्रिय सदस्य होत्या. ज्योतिरावांसोबत त्यांनी १८७६च्या दुष्काळात अथक परिश्रम घेतले आणि महाराष्ट्रात ५२ मोफत भोजन वसतिगृहे सुरू केली होती. १८६३मध्ये ज्योतिराव आणि सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधक गृह नावाचे भारतातील पहिले बालहत्या प्रतिबंध गृह सुरू केले. गर्भवती ब्राह्मण विधवा आणि बलात्कार पीडितांना मुलांची प्रसूती करण्यात यामुळे मदत झाली.

**शैक्षणिक कार्य**

सावित्री बाई फुले व ज्योतिराव फुले यांनी पुण्यात तीन शाळा काढल्या. त्याकाळात सुमारे ३०० विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. १८५२ मध्ये इंग्रज सरकारच्या वतीने या कार्यासाठी फुले दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. सावित्री बाई फुले यांनी उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सन्मानित करण्यात आले. १८५५ मध्ये फुले दाम्पत्यांनी गरीब व कामगार वर्गातील लकांसाठी रात्रकालीन शाळा सुरू केली. शाळांमध्ये मुलींची उपस्थिती वाढवण्यासाठी सावित्रीबाई मुलांना त्या काळात स्टायपेंड देत असत. शिक्षणाच्या महत्त्वाबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी तिने पालक-शिक्षकांच्या बैठका घेतल्या.

**ज्योतिराव फुले यांना समर्थपणे साथ**

१८३१ मध्ये महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाईंचा, त्यावेळच्या प्रथेप्रमाणे, त्यांचा विवाह अवघ्या नऊ वर्षांच्या ज्योतिरावांशी झाला. ज्योतिराव फुले यांच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत समर्थपणे साथ दिली. जुलै १८८७मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने ज्योतिरावांची उजवी बाजू अर्धांगवायू झाली, त्यावेळी सावित्रीबाईंनी ज्योतिरावांची रात्रंदिवस सेवा केली. त्यामुळे ज्योतिराव बरे होऊन पुन्हा लिहू शकले. या काळात फुले परिवाराचे हितचिंतक मामा परमानंद यांनी त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न केले. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात परमानंद यांनी हे जोडपे ज्या ऐतिहासिक कार्यात गुंतले होते त्याची नोंद केली आणि सावित्रीबाईंबद्दल पुढील गोष्टी सांगितल्या, ज्योतिरावांपेक्षा त्यांची पत्नी कौतुकास पात्र आहे. तिची कितीही स्तुती केली तरी वावगे ठरणार नाही. तिच्या उंचीचे वर्णन कसे करता येईल? तिने आपल्या पतीला पूर्ण सहकार्य केले आणि त्याच्याबरोबरीने, त्यांच्या मार्गावर आलेल्या सर्व संकटांचा सामना केला. उच्चवर्णीय उच्चशिक्षित स्त्रियांमध्येही अशी त्याग करणारी स्त्री मिळणे कठीण आहे. या जोडप्याने आपले संपूर्ण आयुष्य लोकांसाठी काम केले आहे. ज्योतिरावांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व शेवटपर्यंत केले. १८९३मध्ये सासवड, पुणे येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेच्या त्या अध्यक्षा होत्या.

**काव्य लेखन**

सावित्रीबाई फुले यांच्या कविता आणि इतर लेखन आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत. सावित्रीबाई फुले यांनी जाती आणि लिंगभेदाच्या विरोधात साहित्यातून प्रबोधन केले. सावित्रीबाई फुले यांनी १८५४मध्ये काव्य फुले आणि १८९२मध्ये बावन काशी सुबोध रत्नाकर ही दोन पुस्तके लिहिली ज्यात त्यांच्या कवितांचे संकलन आहेत.

मुंढवा गावाबाहेरील महार वस्तीतील पांडुरंग बाबाजी गायकवाड यांचा मुलगा प्लेगने त्रस्त असल्याचे समजताच ती तेथे गेली आणि आजारी मुलाला पाठीवर घेऊन रुग्णालयात दाखल झाली. या प्रक्रियेत तिला हा आजार जडला आणि १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता तिचे निधन झाले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सर्वत्र मोठ्या जल्लोषात साजरा करीत आहोत. भारत आगामी काही वर्षात विश्वगुरु होण्याच्या दिशेने आगेकूच करीत आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात महिला स्वतंत्रपणे आणि समर्थपणे आपला ठसा उमटवत सवतःचे अस्तित्व सिद्ध करीत आहे. अशी सर्व सुखात्मक परिस्थिती असल्याच्या आनंदात आपण मश्गुल असताना दुसरीकडे आजही केवळ ४३ टक्के मुलीच पदवी शिक्षणापर्यंत पोहचत आहे. ‘युनिसेफ’ने मार्च २०२२मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सादर केलेल्या अहवालात कोरोनानंतर शाळेत येणाऱ्या मुलींच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे नोंदविले आहे. युनिसेफच्या अहवालानुसार मुलींच्या उच्च शिक्षणातील प्रमाण घटण्यासाठी प्रामुख्याने तीन करणे आहेत ती म्हणजे घरच्यांचा विरोध अथवा घरगुती समस्या, सुरक्षितता व शाळा अथवा शाळेत जाण्यासाठी मूलभूत सुविधांचा अभाव.

भारतातील पहिली स्त्री शिक्षिका, स्त्रियांना शिक्षणाची कवाडे उघडे करून देणाऱ्या आद्य समाज सुधारक, भारतीय स्त्रीवादाची जननी आणि जन्म व जातीवर आधारित भेदभाव आणि त्यामुळे होणाऱ्या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात क्रियाशीलपणे लढा देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे भारतीय स्त्रियांच्या उन्नत्तीत अन्ययसाधारण योगदान आहे. २०२५ मध्येही सावित्रीबाई फुले यांचे विचार केवळ प्रासंगिकच नव्हे तर त्यांच्या विचारांचे आचरण करून त्या विचारांवर आधारित कृतिशील कार्य सातत्याने करण्याची गरज आहे. तीच सावित्रीबाई फुले यांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

**-डॉ. प्रीती प्रवीण स्थूल**

## निवडक

### वळके केंद्राची शिक्षण परिषद



**मुरूड :** येथील वळके केंद्राची शिक्षण परिषद मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या वेळी तळेखार शाळा सभागृहातील व्यासपीठावरून बोलताना नवनियुक्त केंद्रप्रमुख महेश कवळे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा तयारी नियोजनबद्ध रितीने करणचे आवाहन केंद्रातील शिक्षकांना केले. परिषदेत प्रिया पाटील यांनी परीक्षेसंदर्भातील मार्गदर्शन, तर अशोक म्हात्रे यांनी निपुण भारत शैक्षणिक साधनपेटीची सुक्ष्म बारकाव्यांसह ओळख करून दिली. राजाराम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखालील परिषदेसाठी देवानंद गोगर, राजेंद्र जामकर, हेमंत म्हात्रे, जगदीश चवरकर, बाळकृष्ण दरणे, अनंत माळी, राजेंद्र नाईक, मयुरेश जगताप, महेश गायकवाड, मंजिरी गायधनी, सुदर्शन महाडिक आदी उपस्थित होते.

### मजिद हाजिते यांना पुरस्कार

**माणगाव :** येथील ज्येष्ठ पत्रकार तथा तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष मजिद इस्माईल हाजिते



यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, अ‍ॅड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण ३ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. त्या संदर्भातील अभिनंदनपर निवडपत्र पत्रकार मजिद हाजिते यांना निवड समितीचे अध्यक्ष श्रेयश घरत, उपाध्यक्ष आकाश घरत, आकाश राणे, सूत्रसंचालक धनंजय भगत, सल्लागार मंगेश भोणे, चिटणीस स्वप्निल भोईर यांनी आपल्या सहीनिशी दिले आहे.

### विजय मेथा यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव :** येथील ज्येष्ठ उद्योजक तथा तालुका पत्रकार



संघाचे सल्लागार खेमचंद (विजयशेठ) चुनीलाल मेथा यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, अ‍ॅड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण ३ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# गांजाचे सेवन करणारे तरुण ताब्यात

**श्रीवर्धन पोलिसांची कारवाई**

**श्रीवर्धन : बातमीदार**

नववर्षाच्या स्वागतासाठी हडपसर पुणे येथून आलेल्या तरुणांना गांजाचे सेवन करताना श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावर श्रीवर्धन पोलिसांनी रंगेहात पकडले आहे.

श्रीवर्धन येथे नववर्षाच्या स्वागतासाठी हजारो पर्यटकांनी हजेरी लावली होती, परंतु पुणे हडपसर येथून आलेले तरुण श्रीवर्धन समुद्रकिनारी असलेल्या सुशोभीकरण केलेल्या धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती गांजा पीत असल्याची बातमी श्रीवर्धन पोलिसांना मिळाली. त्यानंतर श्रीवर्धन पोलिसांनी या ठिकाणी पाहणी केली असता गांजा पिणारे तरुण आढळून आले.

सनी चव्हाण (वय २७), साहिल सुतार (वय २१), सोमनाथ बनसोडे (वय २३), आशिष राजगिरे (वय १९), आणि शिवा राठोड (वय १९) अशी सर्व आरोपींची नावे आहेत. हे सर्व राहणारे हडपसर येथील मांजरी बुद्रुक या ठिकाणचे रहिवासी आहेत. या घटनेची पोलीस हवालदार प्रशांत देशमुख यांनी फिर्याद दिली. श्रीवर्धन पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे व्यसनाधीनता करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना चांगलाच चाप बसणार आहे. या पर्यटकांकडे गांजा हा अमली पदार्थ कोठून आला व त्यांनी कसा प्राप्त केला याबाबतदेखील पोलीस चौकशी सुरू आहे.

आरोपींना श्रीवर्धनच्या मुख्य समुद्रकिनारी होडी व कोळी पुरुष व महिलेच्या स्टॅच्यू जवळ सिमेंटच्या कट्ट्यावर बसून गांजा पीत असताना पकडण्यात आले आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात १/ २०२५ इतर भाग ६, एनडीपीएस (८)ल २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक यु.बी. रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार जे. जी. गमाले हे अधिक तपास करीत आहेत.

या घटनेमुळे नववर्षाच्या स्वागतासाठी जमलेल्या पर्यटकांमध्येदेखील काही खळबळ माजली होती. कारण सदर आरोपींना रात्री एकच्यादरम्यान अटक करण्यात आली.

## वरसे जरीमरी मंदिर सुशोभिकरणासाठी खासदार तटकरेंकडून १५ लाखांचा निधी



**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वरसे ग्रामपंचायत हद्दीतील जरीमरी मंदिर सुशोभीकरण करता खासदार सुनील तटकरे यांच्या निधीतून सुमारे पंधरा लाखाचा निधी देण्यात आला आहे तसे पत्र खासदार सुनील तटकरे यांनी ग्रामस्थांना दिला आहे. या मंदिर सुशोभीकरण्यास खासदार सुनील तटकरे यांनी निधी मिळवून दिल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे विशेष आभार मानले.

राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून खासदार सुनील तटकरे मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विशेष प्रयत्नातून ग्रामपंचायतीयतीचे सर्वेसर्वा मधुकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्रामपंचायतीच्या दैदिप्यमान विकास होत आहे. वरसे मतदार सुनील तटकरे यांच्या पाठीशी ठामपणे आहेत हे मतपेटीतून दिसून आले त्यामुळे विकासाच्या बाबतीत अधिक झुकता माप खासदार सुनील तटकरे वरसे वासियाना देत आहेत त्यामुळे कितीही नागरिकरण वाढले तरी राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून मूलभूत सुविधा पुरवल्या जात आहेत सदर मंदिर सुशोभीकरणाचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते नवीन वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात करणार असल्याचे माहिती रामा म्हात्रे यांनी दिली.

जरीमरी मंदिर सुशोभीकरणासाठी तातडीने १५ लाखाचा निधी मिळवून दिल्याने सुशोभीकरण दर्जेदार होऊन गावाच्या वैभवात भर पडून ग्रामस्थांच्या अध्यात्मिक विचाराला अधिकचे बल मिळणार आहेत.

पत्र स्वीकारताना माजी सरपंच रामा म्हात्रे, नरेश पाटील, दिनेश कांबळे, जगदीश कांबळे, नितीन कांबळे, किसन कांबळे, भगवान कांबळे, गणेश पडवळ, तुकाराम पडवळ, सुरज म्हात्रे, रजत म्हात्रे, अक्षय पडवळ, राजू केरकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## एम.बी. पाटील स्कूलचे यश

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा पंचायत समितीने तालुकास्तरीय ५२व्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन सुतारवाडी येथे केले होते. स्व. द.ग.तटकरे विद्यालयात झालेल्या या प्रदर्शनात तालुक्यातील सर्व शाळाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये नववी ते बारावी या गटात एम.बी. पाटील इंग्लिश स्कूलने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

एम.बी. पाटील शाळेच्या विज्ञान शिक्षिका रुकसाना सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली पुष्कर विराज टिळक, दिग्विजय सुदाम लांडे, प्रथमेश महेश गोसावी, प्रतीक कोंडीबा जगताप, यशस्वी नरेश डाके या विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जेवर चालणारी सायकल या प्रदर्शनाते सादर केली. या प्रयोगाला गटात प्रथम पारितोषिक देण्यात आले. पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी मेघना धायगुडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. या यशाबद्दल चेअरमन मधुकर पाटील, मुख्याध्यापिका पूनम देसाई, पी.जी. देशपांडे यांच्यासह शिक्षकांनी अभिनंदन केले.

## आजपासून लायन्स किहीम फेस्टिव्हल

**अलिबाग : प्रतिनिधी**

लायन्स क्लब मांडवा विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. याच सामाजिक दायित्वाच भाग म्हणून आणि विविध उद्योजक व ग्राहक वर्ग यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये सुसंवाद व्हावा या उद्देशाने ३ ते ६ जानेवारी या कालावधीत राजा शिवछत्रपती क्रीडांगण, किहीम येथे चार दिवसीय लायन्स किहीम फ़ेस्टिव्हल आयोजित करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये विविध प्रकारचे १०० स्टॉल्स फेस्टिव्हलप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र असणार आहेत.

लायन्स किहीम फेस्टिव्हलमधून संकलित होणार निधी सोगाव येथे बांधल्या जात असलेल्या अकरा गुंठे जागेतील सहा मजली 'लायन्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'साठी आणि चोंढी येथील लायन्स पॅथॉलॉजी लॅबसाठी वापरला जाणार आहे. या फेस्टिवलचे उद्घाटन शुक्रवारी (दि.३) सायंकाळी ६ वाजता आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते होणार आहे. तसेच सोमवारी (दि.६) समारोप होणार आहे.

लायन्स मांडवा श्री शरीरसौष्टव स्पर्धा, महिलांसाठी पाककला स्पर्धा, लायन सुंदरी सौंदर्य स्पर्धा, गुणवंतांचा सत्कार, तरुणाईसह सर्व वयोगटातील रसिकांना आकर्षित करणारी मराठी पाऊल पडते पुढे ही संगीतरजनी असे एकाहून एक सरस कार्यक्रम आणि धम्माल मस्ती या फेस्टिव्हलमध्ये अनुभवता येणार आहे.

या फेस्टिव्हलचे चेअरमन मोहन पाटील असून नियोजन समितीत लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, अमिष शिरगावकर, अरविंद घरत, धवल राऊत, हर्षद पाटील, सुबोध राऊत, अभिजीत गुरव, प्रदीप पाटील, विद्या अधिकारी, मृदुला राऊत, सारिका पाटील आणि लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष जितेंद्र ठाकूर आदी पदाधिकारी, सदस्य आहेत.

# विविध वेषभूषा करून सरत्या वर्षाला निरोप



## वडगावच्या राजिप शाळेत उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

नवीन वर्षाचे स्वागत आणि सरत्या वर्षाला अभिवादन करण्यांसाठी वडगाव येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थी सायंकाळी एकत्र येत विविध महापुरुषांची वेष भुषा करुन तसेच महाराष्ट्रातील विविध धर्माचे पोषाख आणि फॅन्सी ड्रेस परिधान करुन उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.

या वेळी वाघ, शिकारी, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, मनमोहन सिंग, कोळी, आदिवासी, भूत अशा विविध वेशभूषेतील विद्यार्थी पहावयास मिळाले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या या अफलातून संकल्पतून व पालकवर्गातून हा उपक्रम हाती घेण्यांत आला. याचबरोबर विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादर करत वातावरण प्रसंन्न केले.

छोटी नाट्य, पथनाट्य सादर करून शैक्षणिक व सामाजिक संदेश देण्यांत आला. सरत्या वर्षाला अनोख्या पद्धतीने निरोप देणारी वडगाव शाळा आज परिसरातील कुतूहलाचा विषय ठरला आह.

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

याचबरोबर शिक्षक वैजनाथ जाधव, मयुरी धायगुडे, स्वयंसेविका व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांस्कृतिक स्पर्धेत खडकोली शाळेची चमक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील ना.म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथे तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा पार पडली या स्पर्धेमध्ये खडकोली शाळेने यश संपादन करून शाळेचे व गावाचे नाव उंचावले आहे.

जोशी विद्याभवनच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य मोठ्या गटात प्रथम क्रमांक, लहान गटात क्रमांक, माती शिल्प द्वितीय सोहम मोहन सुतार, समूहगीत द्वितीय क्रमांक, पथनाट्य तृतीय क्रमांक अशी एकूण तालुकास्तरीय स्पर्धेत पाच बक्षीस मिळवून अजून एक मानाचा तुरा शिरपेचात रोवला. मोठ्या गटात पारंपरिक नृत्यामधील प्रथम क्रमांक प्राप्त केलेले नृत्य जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माणगावच्या गटशिक्षणाधिकारी तांबट, गोरेगाव बीट विस्तार अधिकारी खामकर, केंद्रप्रमुख साळवी यांनी अभिनंदन केले. शाळेतील विद्यार्थी तसेच मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक, शाळेच्या मुख्याध्यापिका कुंजलता पाटील, मंगला भोसले, मधुरा पवार, परेश अंधेरे, माजी विद्यार्थिनी सानिका गव्हाणे या सर्वांचे शाळा व्यवस्थापन समिती खडकोली व ग्रामस्थांनी कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# उत्तेखोल आश्रमशाळेचे रौप्य महोत्सवी स्नेहसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र संचालित कै. सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित आश्रमशाळा उत्तेखोल शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच थाटात साजरे झाले. प्रतिवर्षीप्रमाणे २६ डिसेंबर या वनवासी कल्याण आश्रमाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हे वर्ष शाळेचे रौप्य महोत्सव वर्ष आहे.



शाळेला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून या वर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रांगोळी प्रदर्शन, विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध वस्तूंचे कलादालन, चित्र प्रदर्शन, विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण, विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, नृत्य, गायन आधी सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आनंद मेळावा अशा विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन या निमित्ताने केले गेले.

या महोत्सवात अनेक मान्यवर सहभागी झाले होते. या वेळी माणगावच्या नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, संकुल समितीचे अध्यक्ष यशवंत पवार, आश्रमशाळा शालेय समितीचे अध्यक्ष महादेव जाधव, वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांतांचे सहसंघटन मंत्री प्रदीप पाटील, संकुल समितीचे सहसचिव रवी पाटील, नितीन चांदोरकर, सदस्य लक्ष्मण जंगम, सदस्य पोळेकर आदी उपस्थित होते.

या वेळी नगराध्यक्ष सुर्वे यांनी शाळेत होत असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी विविध स्तरावरील क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मिळवलेल्या यशाचे कौतुक केले. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी शुभेच्छाही दिल्या. सहसंघटन मंत्री प्रदीप पाटील यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या वसतीगृहातून शिकून मोठे झालेल्या व समाजाची सेवा करत असलेल्या विद्यार्थ्यांची उदाहरणे दिली. विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक उत्तम पाटील व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक अरूण पाटील यांनी केले.

स्नेहसंमेलनाला माणगावमधील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. त्याचप्रमाणे पालकवर्ग व माजी विद्यार्थी, सर्व विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजीव साबळे, माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिक्षिका पोहरे, डॉ. श्रीकांत वैद्य, नितीन बामुगडे आदींनी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## 'डीएमसीसी'तर्फे गरिबांना मदत

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील डीमसीसी स्पेशालिटी केमिकल हा सामाजिक बांधिलकी क्षेत्रात अग्रस्थानी असून अनेक खेड्यापाड्यातील गरजवंताना मदत करून सामाजिक बांधिलकीचा वसा जपलेला आहे.

कंपनीच्या सीएसआर निधीतून कुलदीप कुमार तिवारी, किरण हिंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ला, तळाघर, महादेववाडी, लांढर, वरसे, रोठ खुर्द, रोठ बुद्रुक व चणेरा विभाग अश्या अनेक ठिकाणी शिलाई मशीन, पीठ गिरण (घरघंटी) अशा लघुउद्योगाच्या वस्तूंचे वाटप करून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. पाण्याचे फिल्टर आणि कूलर, मुलांना कपडे अशा विविध प्रकारे कंपनी मदत करीत आहे.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. ज्याचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टा मध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- गव्हाण, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| अनु.क्र | गट क्रमांक/सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र हे. आर. चौ.मी |
|---|---|---|---|
| १ | २०५ | १/अ/१ | ०-४१-२० पो.ख.०-०३-२० |
| | | | एकूण ०-४४-४० |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकत संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणतीही हरकत, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०३.०१.२०२५**

**सही /-**
**अ‍ॅड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड**
**पिन कोड- ४००७०२**
**मोबाईल नं. ७६६६०१०२९३**

# आजपासून सिडनी कसोटी

## भारताचा दुखापतग्रस्त आकाश दीप संघाबाहेर

**बॉर्डर-गावसकर ट्रॉफी**



**सिडनी : वृत्तसंस्था**

बॉर्डर गावसकर कसोटी मालिकेतील ट्रॉफीमधील पाचवा व अंतिम सामना शुक्रवार (दि. ३)पासून सिडनीच्या मैदानावर रंगणार आहे. सामन्यापूर्वी भारताचा वेगवान गोलंदाज आकाश दीप पाठीच्या दुखापतीमुळे संघातून बाहेर पडला आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने फॉर्मात नसलेल्या अष्टपैलू मिचेल मार्शला संघातून वगळले आहे.

भारतीय गोलंदाज आकाश दीप ब्रिस्बेन आणि मेलबर्न कसोटीच्या प्लेइंग इलेव्हनचा भाग होता आणि त्याच्या नावावर पाच विकेट्स होत्या. त्याने गोलंदाजी चांगली करत बुमराहला साथ देण्याचा प्रयत्न केला, पण त्याची गोलंदाजी पाहता नशीबाने त्याला खूप कमी विकेट मिळाल्या. इतकेच नव्हे; तर फलंदाजीतही त्याने चमकदार कामगिरी केली.

भारताचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सिडनी कसोटी सामन्यापूर्वी पत्रकार परिषदेत सांगितले की, आकाश दीप पाठीच्या समस्येमुळे संघाबाहेर झाला आहे. खेळपट्टी पाहून प्लेइंग इलेव्हन ठरवले जाईल, असेही ते म्हणाले. २८ वर्षीय उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने दोन कसोटी सामन्यांमध्ये एकूण ८७.५ षटके टाकली आणि हेच त्याच्या पाठीच्या दुखापतीचे कारण असू शकते.

### ऑस्ट्रेलियाने मिशेल मार्शला वगळले

अखेरच्या कसोटी सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाने फॉर्मात नसलेल्या अष्टपैलू मिचेल मार्शला संघातून वगळले आहे. मार्श या मालिकेत छाप पाडण्यात अपयशी ठरला. त्याने चार कसोटी सामन्यांच्या सात डावात १०.४२च्या सरासरीने केवळ ७३ धावा केल्या आहेत. या ७३ धावांपैकी त्याने पर्थ कसोटीत एकाच डावात ४७ धावा केल्या होत्या, तर गोलंदाजीतही मार्श फार चांगली कामगिरी करू शकला नाही. त्याने पर्थ कसोटीत ३ विकेट्स घेतले, पण त्यानंतर तिन्ही कसोटीत एकही विकेट घेऊ शकला नाही. मार्शच्या जागी ऑस्ट्रेलियाने ३१ वर्षीय अष्टपैलू खेळाडू ब्यू वेबस्टरला पदार्पण करण्याची संधी दिली आहे.

आकाशच्या जागी हर्षित राणा किंवा प्रसिद्ध कृष्णाचा प्लेईंग इलेव्हनमध्ये समावेश केला जाऊ शकतो. पाच सामन्यांच्या मालिकेत भारत १-२ने पिछाडीवर असून बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी भारतीय संघाकडे ठेवण्यासाठी त्यांना पाचवा आणि अंतिम सामना कोणत्याही किमतीत जिंकावा लागेल.

भारतीय संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीर याला पत्रकार परिषदेत कर्णधार रोहित शर्मा सिडनी कसोटी खेळणार का, असा प्रश्न विचारला असता खेळपट्टी पाहून आम्ही प्लेइंग इलेव्हन ठरवू, असे उत्तर त्याने दिले. रोहित शर्माच्या खेळण्याबाबत संभ्रम असेल, तर त्याला वगळले जाऊ शकते, अशी चर्चा चाहत्यांमध्ये सुरू आहे. शेवटच्या कसोटी सामन्यासाठी भारतीय संघात मोठे बदल निश्चित मानले जात आहेत. यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतची जागाही धोक्यात आहे.



# कर्जतमधील ३१ खेळाडूंची राष्ट्रीय ॲथलिट स्पर्धेसाठी निवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील माथेरान व्हॅली स्कूलमधील १० आणि कर्जत शहरातील २१ खेळाडूंची राज्य ॲथलिट स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राष्ट्रीय ॲथलिट चॅम्पियनशिपसाठी राज्य निवड चाचणी घेण्यात आली. यात माथेरान व्हॅली स्कूलमधील खुशी द्विवेदी, खुशबू द्विवेदी, निधी जोईल, वैदेही जाधव, वैष्णवी भोये, पूजा दातेला, अजित सुपे, कुंजय खांजोडे, चारुळ शिंदे, श्वेता खोखले यांनी यश मिळविले, तर कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेचे २१ खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत खेळणार आहेत. या खेळाडूंमध्ये विनंती खडके, जिजा पिंपरकर, मांदिका प्रसाद, सुमित चौधरी, प्राजक्ता खोडके, गणेश ठाकूर, भाविका बोराडे, हरेश ठाकूर, विहान पेरणेकर, अनिकेत गौड, सोनकुमार मुखिया, आर्या पारधी, हर्षल ठाकरे हे सुवर्ण पदक मिळविणारे खेळाडू तसेच प्रणय हिंदोळा, धनराज ठाकरे, सुरेश कुमार, माही चौधरी, मयूर जाधव, आर्यन पजे, कबीर गायकवाड यांचा समावेश आहे. राष्ट्रीय स्पर्धा नाशिकमध्ये होणार आहे.

# नेमबाज स्वप्नील कुसाळेला अर्जुन पुरस्कार

## कोच दीपाली देशपांडे यांचा 'द्रोणाचार्य'ने होणार सन्मान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत सरकारकडून राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. एवढेच नाही तर त्याला नेमबाजीचे धडे देणाऱ्या कोच दीपाली देशपांडे यांचा द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

स्वप्नील कुसाळे हा मूळचा कोल्हापूर जिल्ह्यातील कांबळवाडी या छोट्याशा गावातून येतो. खाशाबा जाधव यांच्यानंतर ऑलिम्पिक स्पर्धेत पदक मिळवणारा तो महाराष्ट्राचा दुसरा खेळाडू ठरला. माजी भारतीय नेमबाज अन् कोच दीपाली देशपांडे यांचा त्याच्या यशात मोलाचा वाटा राहिला आहे.

स्वप्नीलने अनेकदा आपल्या वेगवेगळ्या मुलाखतीमध्ये कोच मॅडम या फक्त माझ्यासाठी गुरू नाहीत तर त्या माझ्यासाठी आईप्रमाणेच आहेत, असे सांगितले आहे. त्यामुळे एका बाजूला लेकाला अर्जुन पुरस्कार अन् दुसऱ्या बाजूला त्याला घडवणाऱ्या आणि यशापर्यंत पोहचण्यासाठी बळ देणाऱ्या आणि आईसमान कोच दीपाली देशपांडे यांचा द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मान होणे ही क्रीडा क्षेत्रातील खास अन् दुहेरी आनंद देणारी गोष्ट आहे.


# राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेचे महाराष्ट्राला अजिंक्यपद

**लखनऊ : वृत्तसंस्था**

१५वी राष्ट्रीय इनडोअर धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धा उत्तर प्रदेश राज्याची राजधानी लखनऊ येथे झाली. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या धनुर्धरांनी आपल्या नेमबाजीचे कर्तब दाखवीत वर्चस्व सिद्ध केले. संपूर्ण देशातून स्पर्धेसाठी निवड झालेल्या सुमारे एक हजार धनुर्धरांवर मात करीत राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. दुसऱ्या स्थानावर उत्तर प्रदेश आणि तिसऱ्या स्थानावर पुद्दुचेरीला समाधान मानावे लागले. महाराष्ट्राने सलग १५ वेळा अजिंक्यपदाला गवसणी घातली आहे.

नाईन स्पॉट हा रोख पारितोषिक असणारा प्रकार या स्पर्धेचे आकर्षण ठरला. या प्रकारात संपूर्ण देशातील तब्बल २८ धनुर्धर आपले कौशल्य दाखविण्यासाठी सहभागी झाले होते. बाद फेरी असणाऱ्या या प्रकारात महाराष्ट्राच्या अखिलेश भोसले या धनुर्धराने उत्तर प्रदेशच्या गुरुविंदर सिंगवर मात करीत एक लाखांचे पारितोषिक पटकावले. अखिलेशने सलग दुसऱ्यांना ही स्पर्धा जिंकली. १५व्या राष्ट्रीय इनडोअर धनुर्विद्या स्पर्धेतील नाईन स्पॉट प्रकारात जिंकण्यासाठी अखिलेश आणि गुरुविंदर यांना तब्बल पावणे दोनशे बाण मारून आपल्या २६ प्रतिस्पर्ध्यांवर मात करावी लागली. स्पर्धेचा शेवट उत्कंठा वाढविणारा होता.





इंडियन राऊंड, रिकर्व्ह राऊंड, कंपाऊंड राऊंड आणि बेअर बो राऊंड या धनुर्विद्या प्रकारात ७ वर्षाखालील, १० वर्षाखालील, १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील, १९ वर्षाखालील, वरिष्ठ गट आणि ३५ वर्षावरील गटांमध्ये ही राष्ट्रीय अर्चरी अजिंक्यपद स्पर्धा खेळवण्यात आली. या स्पर्धेत प्रथमच ७ वर्षाखालील धनुर्धरांची स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा क्रीडा रसिकांचे आकर्षण ठरली.

**रायगडच्या धनुर्धरांचा निशाणा अचूक**

राष्ट्रीय इनडोअर धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील १३ धनुर्धारांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेत करण्यात आली होती. रायगडमधील बावलेकर अर्चरी अकॅडमीतील संतोष जाधव, लाभेश तेली यांच्या मार्गदर्शनाखाली धनुर्विद्या शिकणाऱ्या या १३ धनुर्धरांनी साजेसा खेळ करीत रायगड जिल्ह्याचे नाव देशपातळीवर गाजवले. या खेळाडूंमध्ये कंपाऊंड राऊंड १० वर्षाखालील गटात रुधिरा जाधव सुवर्ण, इंडियन राऊंड १० वर्षाखालील गटात अर्जुन म्हात्रे रौप्य, स्वहा कदम रौप्य, सुवर्ण, क्षितीका महाले रौप्य, इंडियन राऊंड १४ वर्षाखालील गटात आशय आंग्रे सुवर्ण, मुग्धा वैद्य सुवर्ण, कांस्य, अंश पराडकर सुवर्ण, दिव्यनिल दत्ता दोन सुवर्ण, कंपाऊंड राऊंड १४ वर्षाखालील गटात तनीषा वर्तक सुवर्ण, अथर्व पाटील रौप्य आणि कांस्य, आरव हुलवान रौप्यपदक, सई पिळणकर हिने सुवर्णपदक पटकावले. पुरुष वरिष्ठ गटात कंपाऊंड राऊंडमध्ये लाभेश राजेंद्र तेली यांनी एक रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले.

# माणगाव येथे बॅडमिंटन स्पर्धा



**माणगाव : बातमीदार**

माणगाव क्रीडा संकुल येथे टीडब्ल्यूजे कंपनीच्या विद्यमाने तसेच माणगाव स्पोर्ट्स बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयोजनाने यज्ञेश उभारे याच्या स्मरणार्थ भव्य बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

बॅडमिंटनच्या दुहेरी प्रकारातील या स्पर्धेत खुला गट व ४५ वर्षावरील गट असे दोन गट होते. खुल्या गटात ३२ संघांनी, तर ४५ वर्षावरील गटात १६ संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, माजी नगरसेवक नितीन बामुगडे, डॉ. प्राजक्ता उभारे तसेच टीडब्ल्यूजेचे आकाश कोतवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेत खुल्या गटात तुषार माने व अक्षय भिंगारे (पनवेल) यांनी प्रथम क्रमांक, प्रथमेश गोसावी व ओमकार गोसावी (माणगाव) द्वितीय आणि डॉ. भूषण सवादकर व कुलदीप शर्मा (माणगाव) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. ४५ वर्षावरील खुल्या गटात संतोष कुंभार व मनिष पाटील, महेश गोसावी व समीर आचार्य, सचिंद्र पाटील व नागेश शिंदे हे अनुक्रमे प्रथम तीन क्रमांकाचे विजेते ठरले.

## कुमार-कुमारी निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# पुणे ग्रामीण, ठाणे शहर संघ विजेते

**सांगली : प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण आणि ठाणे शहर यांनी अनुक्रमे कुमारी व कुमार गटाचे विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने या ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते.

राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष माजी आमदार दिनकर तात्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगली सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर झालेल्या कुमारीच्या अंतिम सामन्यात गतउपविजेत्या पुणे ग्रामीण संघाने गतविजेत्या पिंपरी चिंचवडचा प्रतिकार ३२-२५ असा मोडून काढत स्व. चंदन सखाराम पांडे फिरत्या चषकावर आपले नाव कोरले. या विजयाने पुणे ग्रामीणने गत वर्षातील पराभवाची परतफेड केली.



पुणे संघाने पूर्वार्धात पहिल्या चार मिनिटात लोण देत ९-१ अशी आघाडी घेतली. पिंपरी चिंचवडने यातून सावरत लोणची परतफेड करीत ही आघाडी कमी केली. विश्रांतीला १८-१३ अशी पुणेकडे आघाडी होती. विश्रांतीनंतरदेखील सामन्यात चुरस पहावयास मिळाली, पण पुण्याने आपल्या हातून आघाडी निसटून दिली नाही. शेवटी सात गुणांनी पुणे ग्रामीणने सामना जिंकला. वैभवी जाधव, साक्षी रावडे यांच्या झंझावाती चढाया त्यांना प्रतीक्षा लांडगे, सृष्टी मोरे यांची मिळालेली पकडीची साथ यामुळेच हे शक्य झाले. पूजा तेलंग, रूपाली डोंगरे, भूमिका गोरे, वृषाली रोकडे यांचा खेळ पिंपरी चिंचवडला विजयी करण्यात थोडा कमी पडला.

कुमार गटात ठाणे शहरने पुणे ग्रामीणचा कडवा प्रतिकार ३३-३१ असा पराभव करीत स्व. प्रभाकर नागो पाटील फिरता चषक आपल्या नावे केला. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात पूर्वार्धात २४-१० अशी आघाडी ठाणे संघाकडे होती. उत्तरार्धात पुण्याने विजयासाठी ठाण्याने चांगलेच झुंजविले. शेवटची पाच मिनिटे पुकरली तेव्हा ३२-२६ अशी ठाण्याकडे आघाडी होती. आफताब मन्सुरी, आदित्य पिलाने, रोहन टोपरे यांच्या चढाई पकडीच्या खेळाने ठाणे शहरने हा चषक उंचाविला. प्रणव बांगर, साहिल माने, रोहन टोपारे यांनी उत्तरार्धात कडवी लढत देत आघाडी कमी केली, पण संघाला विजयी करण्यात ते अयशस्वी ठरले.

या अगोदर झालेल्या मुलींच्या उपांत्य सामन्यात पिंपरी चिंचवडने अहिल्यानगरला ३२-१७ असे, तर पुणे ग्रामीणने ठाणे शहराला ३६-२६ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली. मुलांच्या सामन्यात पुणे ग्रामीणने सांगलीला ३२-१७ असे, तर ठाणे शहरने रायगडला ३४-२८ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती.



# कुस्ती स्पर्धेत निखिल भोपीला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अलिबाग येथे झालेल्या रायगड जिल्हा अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत पनवेलच्या रिटघर येथील निखिल भोपी याने ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला. याचबरोबर त्याची पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

निखिलच्या या यशामागे त्याचे प्रशिक्षक व वडील विश्वनाथ भोपी यांचे मोठे योगदान आहे. या यशाबद्दल निखिलचे सरपंच सुभाष भोपी, सदस्य शांताराम चौधरी, विश्वास पाटील, माजी सरपंच भारत भोपी यांनी अभिनंदन करून सत्कार केला. त्याचप्रमाणे रिटघर पोलीस पाटील दीपक पाटील व ग्रामस्थ यांच्या वतीनेही निखिलला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# 'आरडीसीए'ची वार्षिक सभा १३ जानेवारीला

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन सोमवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता पेण येथे करण्यात येणार आहे.

सभेबाबत असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य, आश्रयदाता सदस्य, तहयात सदस्य, सामान्य सदस्य, सर्व क्लब व अकॅडमीचे सदस्य व माजी खेळाडू यांना कळविण्यात आले असून काही सदस्यांना यदाकदाचित माहिती नसल्यास या प्रसिद्धी पत्रकाद्वारे सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील क्रिकेट खेळाच्या विकास व विविध वयोगटातील स्पर्धांचे आयोजन करण्याविषयी चर्चा करणे तसेच जिल्ह्यातील क्रिकेटच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे निर्णय या सभेत घेतले जाणार असल्याची माहिती आरडीसीएचे सचिव प्रदीप नाईक यांनी दिली.

# अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी स्नेहल, अंकुशकडे महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्व





**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली येथे ३ ते ८ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धेकरिता स्नेहल साळुंखे या शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय खेळाडूच्या खांद्यावर महाराष्ट्राच्या महिला संघाची धुरा सोपविण्यात आली आहे. पुरुष संघाचे नेतृत्व सलग सहा वर्ष महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व केलेल्या अंकुश महाले याच्याकडे देण्यात आले आहे.

महिला संघात स्नेहलसोबत पहिली जागतिक महिला कबड्डी स्पर्धेत खेलेली सुवर्णा बारटक्के तसेच नुकताच शिवछत्रपती पुरस्कार मिळविलेल्या सायली जाधवचाही समावेश आहे. या संघात निलेश चिंदरकर हा अनुभवी खेळाडू आहे. चार दिवसांच्या सरावानंतर हा संघ स्पर्धेकरिता दिल्लीला रवाना झाला.

महिला संघ : स्नेहल साळुंखे संघनायिका, सुवर्णा बारटक्के, सायली जाधव, प्रियांका तावडे, कल्पिता शिंदे, मनीषा जगताप, मनीषा मानकर, स्वाती काकडे, अलका निमसे, वैशाली खरमाळे, माधवी राऊळ, सारिका क्षीरसागर, जयश्री साठे, ज्योती राक्षे. प्रशिक्षक संतोष जाधव, व्यवस्थापक गणेश भोईर.

पुरुष संघ : अंकुश महाले संघनायक, निलेश चिंदरकर, मारोती पवार, शुभम मोठे, अजिंक्य महाले, विक्रम कदम, सूरज कांबळे, बालाजी क्षीरसागर, शुभम सुर्वे, कुणाल शिंदे, विशाल कोटमे, नागराज जाधव, नितीन मोरे. प्रशिक्षक आनंदा हेगडे, व्यवस्थापक जयवंत शेट्ये.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com